# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २९/५/२००७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.०३) इतिवृत्त

मंगळवार दिनांक **२९ मे २००७** रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **दुपारी ११.५० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त, नगर सचिव व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

1. डॉ. आशा उत्तमराव बिनवडे
2. श्री. पुनमचंद सोनाजी बमणे
3. श्री. मधुकर दामोधर सावंत
4. श्री. हिंमतराव साळूबा दाभाडे
5. श्री. मो. जावेद मो. इसाक
6. श्री. हाजी शेरखान अ. रहेमान
7. श्री. अ. रशीद खान (मामु)
8. श्री. मोहन धन्नुलाल मेघावाले
9. श्री. संजय रामदास जोशी
10. श्रीमती जयश्री सारंग किवळेकर
11. श्री. पुरूषोत्तम रघुवीरसिंग ठाकुर
12. श्री. कचरू विश्वनाथ मोरे
13. श्री. अ. साजेद अ. सत्तार

**<u>संवाद :</u>**

श्री. अ.रशीद खान (मामू) : प्राणी संग्रहालयाचे संचालक डॉ.रझवी यांचेवर महानगरपालिकेचे अधिकारी म्हणून केस केलेली आहे. आपणाकडून त्यांना वकील देण्यात यावे.

श्री.संजय जोशी : प्राणी संग्रहालया संदर्भातील सविस्तर अहवाल मागवून घ्यावा आणि जी केस करण्यात आलेली आहे, ती काय म्हणुन आहे. प्राणी संग्रहालयाचे संचालक म्हणुन केस दाखल झालेली असल्यास मनपाचा अधिकारी म्हणुन गृहीत धरता येईल व त्यास प्रोटेक्ट करता येईल. आणि वैयक्तिकरित्या केस दाखल असल्यास त्याबाबत विचार करता येईल. स.सदस्य श्री.रशीद मामू म्हणतात त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

श्री.मो.जावेद मो.इसाक : मी मागील दोन महिन्यांपासून सतत चर्चा करीत आहे की, मनपाच्या ज्या मालमत्ता आहेत त्यावर अतिक्रमणे होत आहेत. त्याबाबत प्रॉपर्टीचे पझेशन न घेता मनपाने रस्ते व कोणत्याही सुविधा दिलेल्या नाहीत. वास्तविक पाहता मनपातर्फे मोबदला देण्यात आलेला असूनही पझेशन मात्र घेतलेले नाही, याबाबतची माहिती द्यावी. दुसरे असे की, औरंगाबा शहरात दुर्गंधीयुक्त पाणी गेल्या 6 महिन्यांपासून सतत येत आहे, याबाबत नागरीकांतर्फे तक्रारी येत असूनही मनपातर्फे कोणत्याही प्रकारचे फॉल्ट काढले जात नाही, याचे कारण काय? माजी नगरसेविका श्रीमती निखत झैदी

यांचे घरासमोर गेल्या 6 महिन्यांपासून दुर्गंधीयुक्त पाणी येत आहे. अनेकदा सांगूनही उप अभियंता किंवा कनिष्ठ अभियंता यांचेकडून अद्यापही कार्यवाही झालेली नाही. आपल्याला माहित आहे की, हर्षनगर येथे दुर्गंधीयुक्त पाण्यामुळे नागरीकांचे काय हाल होत आहेत. एवढे असूनही प्रशासन योग्य ती खबरदारी घेत नाही. याच संदर्भात मी माझ्या वार्डातील पाईपलाईन बाबतपत्राद्वारे कळविले होते की, ज्या ठिकाणी पाण्याची पाईपलाईन आहे त्या ठिकाणावरून ड्रेनेजची लाईन काढून नवनि पाईपलाईन टाकण्यात यावी. परंतु काहीही कार्यवाही होत नाही. याबाबत प्रशासन दुर्लक्ष का करते ते समजत नाही.

मा. सभापती : संबंधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

कार्य.अभियंता(पा.पु.) : स.सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नानुसार सिटी चौकातील माजी नगरसेविका श्रीमती निखत जैदी यांच्या घरासमोर घाण पाणी येत हाते, त्याबाबत 3 दिवसांपुर्वीच कार्यवाही करण्यात आलेली असून तक्रारीचे निवारण करण्यात आलेले आहे. पुन्हा आजही निरोप आला, त्या संदर्भात पाहणी करून कार्यवाही करण्यात येईल.

श्री.मो.जावेद मो.इसाक : गेल्या सहा महिन्यांपासून सांगूनही कार्यवाही होत नव्हती असे माजी नगरसेविकेने सांगितले. तर मी तीन महिन्यांपासून सांगत आहे. संबंधीत अधिकारी कार्यवाही करीत नाही. हे सर्व शहरातील वसाहतीत अशाच प्रकारे प्रश्न उद्‌भवत आहेत. याप्रमाणे रहेमानिया कॉलनीत सुध्दा घाण पाणी येत आहे.

कार्य.अभियंता(पा.पु.) : तीन दिवसांपुर्वीच सिटी चौकातील तक्रार निवारण करण्यात आलेले आहे. आजही याच संदर्भात निरोप आलेला असून त्याची प्रत्यक्षात पाहणी करून कार्यवाही करण्यात येईल. त्याचप्रमाणे रहेमानिया कॉलनी बाबतचे प्रश्ना संदर्भात सुध्दा आजच पाहणी करून कार्यवाही करण्यात येईल.

श्री.अ.रशीद खान(मामू) : शहरातील अतिक्रमणासाठी एकच जेसीबी मशीन ठेवण्यात आलेले आहे आणि वॉर्ड सहा आहेत. तेव्हा जेसीबी मशीनची कमतरता दिसून येते. किमान दोन जेसीबी मशीन असावयास पाहिजेत किंवा वार्डातील अतिक्रमण काढणेची कामे वॉर्ड अधिकारी यांचेकडे न देता पुर्वीसारखे मुख्य कार्यालयात अतिक्रमण हटाव पथक ठेवावे. कारण वॉर्ड अधिकाऱ्यांकडे कर्मचाऱ्यांची कमतरता असते आणि ते कामे करण्यास टाळाटाळ करतात. यासाठी मुख्य कार्यालयात अतिक्रमणाची कामे असावीत. याबाबतचा खुलासा करावा.

श्रीमती जयश्री किवळेकर : अतिक्रमण हा विषय सिडकोला फार त्रासदायक ठरलेला आहे. सिडकोचे मनपाकडे हस्तांतर झाले त्यास एक वर्ष झाले. सिडकोचे अतिक्रमण, सिडकोचे ग्रीन बेल्ट, सिडकोचे गार्डन, ओपन स्पेस, प्ले ग्राऊंड इ. बाबत मनपाने कुठल्याही प्रकारे जबाबादारी घेऊन काम केलेले नाही. ग्रीन बेल्ट हा सिडकोने ग्रीन करणेसाठी ठेवलेला होता. तो आता ग्रीन बेल्ट या ठिकाणी शिल्लक राहिलेले नसून ग्रीन बेल्टच्या ठिकाणी शॉप बेल्टच्या टपऱ्या टाकलेल्या आढळून येतात. आणि त्यामुळे नागरीकांना जाता येताना चालत असतांना भयंकर त्रास होत आहे. प्ले ग्राऊंड हे सिडकोने कोणत्याही प्रकारे विकसित न केल्यामुळे ग्रीन बेल्ट, प्ले ग्राऊंड हे नाहीसे होत चालले आहेत. सिडकोमध्ये जे गार्डन आहे ते राहिलेले नसून वाळवंट झाल्याचे दिसून येते. कारण या ठिकाणच्या गार्डनची देखभाल व्यवस्थित होत नाही. तेव्हा सिडको भागामध्ये अतिक्रमण हटविणे संदर्भात काय व्यवस्था प्रशासनाने केलेली आहे. एखाद्या नागरिकाने अतिक्रमणातील टपरी संदर्भात तक्रार केली तर आम्ही

त्यांना सांगतो शुक्रवारी गाडी येणार आहे. तोपर्यंतही गाडी काही येत नाही. आणि अतिक्रमणे काढल्या जात नाही. उलट वाढतच जाते. ज्या पध्दतीने विकासाचा दर वाढायला पाहिजे असतो तेवढ्या प्रमाणात विकास न करता अतिक्रमणे जास्त प्रमाणात वाढत आहेत. सिडकोच्या विकासाच्या बाबत सभागृहात सक्षमतेने निर्णय घ्यावा.

श्री. संजय जोशी : स.सदस्या श्रीमती किवळेकर यांनी सिडकोच्या संदर्भात मुद्दे मांडले. दुर्दैव असे की, सिडकोसाठी प्रभारी प्रशासकीय अधिकारी यांची नेमणूक झालेली होती. शहरातील अतिक्रमणेच प्रशासन थंबवू शकत नाही. आता सिडको मनपात समाविष्ट झालेले आहे. सिडको भागाची मनपा अधिकाऱ्यांना माहिती व्हावयाची आहे. सिडकोकडून सर्वसाधारण सभेमध्ये मंजुरी घेऊन एका अधिकाऱ्यास मनपात सामावून घेतले होते. सिडकोचे अतिक्रमण हे थांबवायचे असते तर प्रशासकीय अधिकाऱ्यास परत त्याच विभागात जावू दिले नसते. मनपात प्रशासकीय अधिकारी म्हणून रूजू झालेले असतांना मनपा टेबल खुर्ची देवू शकले नाही. त्यांच्यासाठी गाड्या तर दूरच राहू द्या. कर्मचारी काही तातडीने मिळत नव्हता. याचाच अर्थ प्रशासनालाच सिडकोचे अतिक्रमण काढावयाचे नव्हते असे दिसून येते. शहरातील प्रत्येक रोडवर अतिक्रमणे/टपऱ्या वाढलेल्या आहेत. आपण परवाला खामनदी पाहावयास गेलो. त्या ठिकाणी सर्व पदाधिकारी जावून आले. परंतु पदाधिकारी यांची पाठ फिरली की, अतिक्रमणाचे बांधकाम सुरू होतात. मनपा प्रशासन संरक्षक भिंतीसाठी अंदाजपत्रक मंजुर करून घेते. मात्र परत अतिक्रमणाचे बांधकाम सुरू होते. म्हणजे रू.2.00 कोटीची मंजूरी देवूनही त्या ठिकाणचे झालेले अतिक्रमणही प्रशासन काढू शकत नाही. शासनाच्या नियमाप्रमाणे जालना रोडवरील अतिक्रमणे आपण काढलीत, तर घाटीतील अतिक्रमणे आपण काढलीत. परंतु परत दोन महिन्यात परिस्थिती "जैसे थे" झाली. आपण प्रशासकीय विभागात पोलीस कर्मचारी नेमले आहेत. ते पगार घेऊन बिचारे राहतात. एवढा सर्व अतिक्रमणावर खर्च का करतो. शहरातील अतिक्रमणे काढणेसाठी व सिडकोसाठी असे दोन प्रशासकीय अधिकारी यांची नेमणूक करण्यात यावी. पूर्ण शहरासाठी एक गाडी आणि चार इमारत निरीक्षक यांचेकडून अतिक्रमण हटविणेचे काम होणार नाही. गेल्या तीन महिन्यांपासून वॉर्ड अधिकाऱ्यांकडे अतिक्रमणाचे काम सोपविले परंतु त्यांचेकडे इमारत निरीक्षकच दिले नाही. तक्रार प्राप्त झाल्यास संबंधीत अधिकारी स्वच्छता निरीक्षकाकडे काम सोपवितो. म्हणजे इमारत निरीक्षकाचे काम स्वच्छता निरीक्षक चालू काम सोडून पाहतो. शहर व सिडकोसाठी दोन प्रशासकीय अधिकारी यांची नेमणूक करून अतिक्रमण कसे थांबेल याची व्यवस्था प्रशासनाने करावी.

श्री.अ.रशीद खान(मामू) : सिडकोतील एका अधिकाऱ्याची प्रशासकीय अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली होती. परंतु काही कर्मचाऱ्यांनी विरोध दर्शविला की, ज्येष्ठता बाबत फरक पडणार. म्हणून संबंधीत अधिकाऱ्यास या ठिकाणावरून जावे लागले. काही अधिकाऱ्यांनी असे भासविले की, एखाद्या नगरसेवकाने अतिक्रमणा बाबत तक्रार केली तर संबंधीत अधिकाऱ्याला जावून सांगितले जाते की, स.सदस्यांनी सांगितले म्हणून तुमच्याकडे आलो. म्हणजे अशा प्रकारचा बदनामीचा पायंडा या ठिकाणी असू नये. अशा अधिकाऱ्यांना आपण "कारणे दाखवा नोटीस" बाजवून समज द्यावी. हे थांबवावे.

श्री.मोहन मेघावाले : स.सदस्या श्रीमती किवळेकर व श्री.संजय जोशी यांनी अतिक्रमणावर चर्चा केली. सिडको भाग हस्तांतर होवून एक वर्षाचा कालावधी झालेला आहे. टीव्ही सेंटर हडको येथील छत्रपती संभाजी महाराजांचे पुतळ्या भोवती दिवसेंदिवस अतिक्रमणे वाढत जात आहेत. या भागातील जे रसवंती चालक आहेत त्यांना किती दिवसांची परवानगी दिली याची माहिती द्यावी आणि त्या रसवंतीसाठी किती आकाराच्या जागेसाठी परवानगी देण्यात आली आहे. याचे कारण असे की, एका रसवंती धारकाने बरीच मोठी जागा घेऊन ठेवलेले आहे. या भागात रिक्शा स्टँड आहे. रस्त्यावरती रिक्शा कसेही उभे ठेवतात. त्यामुळे या भगातील नागरिकांना चालण्यास भयंकर त्रास होतो. तेव्हा मा.सभापती यांनी अतिक्रमणाचे संदर्भात ठोस असे पाऊल उचलावे. जळगांव रोडवरील टपऱ्या, हॉटेल्स यांचेही अतिक्रमण वाढलेले आहे.

श्री.हिंमतराव दाभाडे : अतिक्रमणा संदर्भात गेल्या 2 वर्षापासून मी तक्रारी मांडत आहे. मनपा प्रशासन फक्त अंदाजपत्रकीय कामाकडे लक्ष न देता, एखाद्याने अतिक्रमणाबाबत तक्रार केली असता संबंधीत अधिकारी त्यांचे कनिष्ठ कर्मचाऱ्यास त्या ठिकाणी पाठवितात. व ते कर्मचारी सदरील व्यक्तीकडून पैसे घेऊन काम करीत नाही. उस्मानपुरा येथे पोलीस चौकीच्या बाजूला एक रसवंती टाकलेली आहे. त्याचा कालावधी संपल्यानंतर ते प्लॉट सोडून जातात. परंतु सामान तिथेच राहते. भविष्यात संबंधीतास प्लॉट हडप करावयाचा आहे काय? याचा खुलासा करावा, असे माझे मत आहे. त्याच्यानंतर संजय सोसायटी याच्या बाजुला एक नाला आहे त्या बाजूला पानटपरी अनधिकृत आहे ते अद्यापही हटविलेले नाही. माजी उप महापौर श्री.प्रकाश निकाळजे यांची टपरी हटवावी म्हणुन बऱ्याच वेळेस मागणी केलेली आहे. आतापर्यंत हटविलेली नाही. एकनाथनगर येथे एमएसईबीच्या डीपी जवळ 10x10 ची टपरी टाकलेली आहे ते हटवावे म्हणुन बऱ्याच वेळेस सांगितलेले आहे. ती सुध्दा अतिक्रमण हटविण्यात आलेले नाही. कोर्टासमोर बरेचसे अतिक्रमण झालेले आहे. आपण गट्टू बसविलेले आहे. त्याचा उपयोग व्यवस्थितरित्या होत नाही. तेथे सामान्य लोक गाड्या लावून गर्दी करतात. आपण शहरात किती दिवस अतिक्रमण वाढू देणार याचा खुलासा द्यावा. अतिक्रमण झालेले काढणार किंवा नाही याचा स्पष्टपणे खुलासा करावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : नगर रचना विभागाने 2005-2006 या वर्षात एकूण 650 बांधकाम परवानगी दिलेल्याआहेत. 2006-07 मध्ये माझ्या माहिती प्रमाणे 335 बांधकाम परवानगी दिलेल्या आहेत. म्हणजे या दोन वर्षातऔरंगाबाद मनपा हद्दीत फक्त 1000 च्या आत बांधकाम परवानग्या देण्यात आलेल्या आहेत. प्रशासनाने मला लिखीत खुलासा केलेला आहे की, शहरात एकूण 80 हजार घरे अनधिकृत झालेले आहेत. या ठिकाणी स्पेक या संस्थेने स्वतःची पाठ थोपटून नवीन 60 हजार घरांना टॅक्स लावलेला आहे. या संदर्भात मी वेळोवेळी मा.आयुक्त व संबंधीत अधिकाऱ्यांना पत्र दिलेले आहे. संबंधीत बांधकामे व ज्यांची सहमती बांधकामाबाबत नाही त्यावर अद्यापही कोणतीही कार्यवाही झालेली नाही. 80 हजार घरे औरंगाबाद मनपा हद्दीत बांधकामे अनधिकृत रित्या झाल्याचे प्रशासनाने लिखीत पत्र दिलेले आहे. माझे म्हणणे असे आहे की, जी 80 हजार घरे अनधिकृतरित्या शहरात बांधल्या गेली त्यास जबाबदार कोण? त्यांचेवर काही कार्यवाही करणार आहात काय? प्रशासनाने Active पणा असा दाखविला की, 80 हजार घरे अनधिकृत झाल्यामुळेप्रशासकीय

विभाग बंद करून टाकला आणि वॉर्ड अधिकाऱ्यांकडे याचे कामकाज देण्यात आले. वॉर्ड अधिकाऱ्यांकडे कोणत्याही प्रकारचा कर्मचारी वर्ग दिला नाही. त्यांचेकडे मालमत्ता कर वसुली, पाणीपट्टी वसुली, साफसफाई आणि इतर कामे आहेत. तेव्हा मनपा शहरासाठी एक व सिडको विभागासाठी एक प्रशासकीय अधिकारी यांची नेमणूक होणे आवश्यक आहे. त्यामुळे अतिक्रमणे होणारी नियंत्रणात येऊ शकतील. त्यामुळे मनपाचा आर्थिक फायदा होऊ शकतो. एखादा व्यक्ती घर बांधकाम करावयास काढतो तेव्हा मनपाची परवानगी काढावयाची असल्यास बेटरमेंट व शहर विकास निधी असे मिळून रूपये 20-30 हजार मनपाकडे भरणा करावी लागते. आणि अनधिकृत बांधकाम करावयाचे झाल्यास इमारत निरीक्षकांचे खिशात 10-15 हजार भरणा केले जाते. यासाठी सिडको व शहरी भागासाठी असे दोन प्रशासकीय अधिकारी यांची नेमणूक होणे गरजेचे आहे आणि शहरात 80 हजार घरे अनधिकृत झालेली आहेत. त्यास जबाबदार कोण याची चौकशी करणे व खुलासा होणे आवश्यक आहे.

उप आयुक्त(प्र) : अनधिकृत बांधकामा बाबत जी चर्चा चालू आहे याबाबत 3-4 महिन्यापुर्वी सर्वसाधारण सभेमध्ये चर्चा झाली होती. यापुर्वी प्रशासकीय विभाग हा कार्यरत होता आणि त्याच्या अधिपत्याखाली सर्व इमारत निरीक्षक हे काम पहात होते. ज्यामुळे सेंट्रलायझेशन (मध्यवर्ती) ठिकाणावरून कामकाज चालत असे. परंतु सर्वसाधारण सभेमध्ये चर्चा झाल्याप्रमाणे आणि नियमाप्रमाणे वॉर्ड अधिकारी यांचेकडे हे अधिकार प्रदान करावे असा सूर निघाला त्यामुळे 2 एप्रिल पासून वॉर्ड अधिकारी यांचेकडे प्रशासकीय विभागाचे कामकाज सोपविण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने वॉर्ड अधिकारी यांना 2 एप्रिल पासून सर्व अधिकार प्रदान केले असल्याने त्यांनी शहरातील जे-जे अनधिकृत बांधकामे असतील, त्यांना नोटीसा बजावणे, निष्कासीत करणे, काढून टाकणे व पंचनामा करणे इ. चे अधिकार देण्यात आलेले आहेत. आणि तेव्हापासून आजपर्यंत हे कार्य वॉर्ड अधिकाऱ्यांमार्फत प्रस्तावित करण्यात आले आहे. संबंधीत वॉर्ड अधिकाऱ्यांकडे आपल्याकडे जे-जे इमारत निरीक्षक उपलब्ध होते ते इमारत निरीक्षक व मजूर वॉर्ड कार्यालयाकडे नियुक्त करण्यात आले. एकंदर गेल्या दोन महिन्यांची जर का पाहणी केली तर वेळोवेळी स.सदस्य व आजच्या स्थायी समिती सभेमध्ये जी चर्चा झाली हा विभाग पुन्हा सेंट्रलाईज करता येईल, याबाबत सविस्तर अहवाल व आपल्या भावना मी नियमित मा.आयुक्त यांचेकडे सादर करतो. त्यानंतर नियमाप्रमाणे कार्यवाही प्रस्तावित करता येईल. ज्या भागामध्ये अतिक्रमणे आहेत त्या-त्या भागातील अतिक्रमणे काढुन घेणे बाबत वॉर्ड अधिकाऱ्यांना सुचित करता येईल. स.सदस्य श्री.हिंमतराव दाभाडे, श्रीमती जयश्री किवळेकर व इतर स.सदस्यांनी केलेल्या सुचनेप्रमाणे प्रशासनातर्फे योग्य ती दखल घेऊन कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल. पुढील सभेत अहवाल देण्यात येईल.

श्री.अ.रशीद खान(मामू) : वॉर्ड कार्यालयास लग्नाचे सुध्दा काम दिल्या जाते. त्या स्वच्छता निरीक्षकास साफसफाईचे काम दिल्या जाते. जर वॉर्ड अधिकारी यांचेकडे अतिक्रमणाचे काम दिल्यानंतर त्यांचेकडे इमारत निरीक्षकांची नियुक्ती केली काय? फक्त मजूर देण्यात आले. इमारत निरीक्षकांची नियुक्ती केलेली नव्हती. त्यामुळे वॉर्डातील अतिक्रमणे ही तशीच राहात होती. या चुका प्रशासन करीत होते. त्यामुळे तक्रारी वाढत होत्या.

आपण आपली पॉलीसी डिसाईड करावी आणि प्रशासनाने स्वतःची चूक कबूल करावी.

श्री.संजय जोशी : खाम नदीसाठी वेळोवेळी चर्चा करून सभेमध्ये करोडो रूपयांचे बजेट ठरलेले आहे. कुणाचे घरे वाहून जावू नयेत, पावसाच्या पाण्यामुळे पुरात घरे वाहून जावू नयेत, नुकसान होऊ नये या चांगल्या हेतूने व आपल्या सद्सदविवेक बुध्दीला स्मरून आपण हा निर्णय घेतलेला आहे. त्या ठिकाणी कराडो रूपये खर्च करण्यास मंजुरी दिलेली असतांनाही त्या ठिकाणचे लोक तेथून घरे काढायला तयार नाहीत. आमचे सन्माननीय पदाधिकारी त्या ठिकाणी गेले, त्यांना बाँड दाखविण्यात आला. ही जागा आमच्या मालकीची आहे असे म्हणून आणि तेथून स.पदाधिकारी यांना परत यावे लागते. या संदर्भात 8-10 दिवसांपासून आपण कार्यवाही करीत आहोत. तसेच यासाठी आपण नवीन खरेदी केलेली जेसीबी मशीन खराब व नादुरूस्त झालेली आहे.त्यावर खाम नदीच्या बाबतीत आऊटपुट काय निघाले, खर्च मात्र लाखो रूपयांचा झाला. तेथील स.सदस्य म्हणतात की, त्या भागातील घरे पक्के बांधकाम करावयाचे जेणे करून घरे वाहून जावू नये. अशी सदस्यांची भावना होती. परंतु त्या भागातील नागरिक जर का प्रतिसाद देत नसतील तर कोण काय करणार.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : खाम नदीचा नकाशा मनपा प्रशासनाकडे आहे का? कारण या संदर्भात स.पदाधिकारी व काही नगरसेवक त्या ठिकाणी प्रत्यक्षात जाऊन आलेले आहेत. आपण लोकांचे म्हणण्याप्रमाणे काम करणार की नियमानुसार कार्यवाही करणार. कारण खामनदीचे जे पात्र आहे तो नदीचा नकाशा आपल्याकडे उपलब्ध आहे काय? स.सदस्य श्री.जोशी यांनी आताच उल्लेख केल्याप्रमाणे या खाम नदीच्या बाबतीत आतापर्यंत दोन लाख रूपये खर्च प्रशासनामार्फत झाले. तेथील माती काढण्याचे व घरे पाडण्याचे एकही काम करण्यात आलेले नाही. त्या ठिकाणी आम्ही पदाधिकारी मिळून जातो व येतो. जवळपास 8 कि.मी. आम्ही फिरतो. परंतु त्याबाबत काहीही कार्यवाही झालेली नाही. एका ठिकाणी आम्ही पदाधिकारी जाऊन सर्व काही बसुन चर्चा करून समझौता केला परंतु आम्ही तेथून गेल्यानंतर एका व्यक्तीने डोके फोडून घेतले. माझे तर असे म्हणणे आहे की, खाम नदीच्या नकाशाप्रमाणे काम करावयास पाहिजे. माझ्याही वॉर्डात खाम नदी आहे, त्या भागातील काही नागरिक अतिक्रमण करीत आहेत. त्याबाबत कार्यकारी अभियंता(विड्रेइवउ) यांना गेल्या सहा महिन्यांपासून सांगितलेले असतांनाही कार्यवाही झालेली नाही. त्या ठिकाणी रिटेनींग वॉल बांधण्यात यावी, ज्यामुळे अतिक्रमण होणार नाही.

मा. सभापती : संबंधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

कार्य.अभि.(ड्रेविइवउ) : हा विषय गेल्या 8-10 दिवसांपासुन चर्चिला जात आहे. मागील बैठकीपुर्वी आम्हाला स्थायी समितीने असे आदेशीत करण्यात आलेले होते की, शहरातील सर्व नाल्यांचे सर्वेक्षण करण्यात यावे आणि त्याची रूंदी फिक्स करावी. रूंदी पाहुन, किती रूंदी असावी ते लक्षात घ्यावे. त्याचे कॅचमेंट एरिया वगैरे पाहून त्या ठिकाणी किती विड्थ पाहिजे त्यादृष्टीने अभ्यास करावा. त्याबाबत खोत पाटील अँड असोसिएटस् या नावाचे प्रायव्हेट सर्व्हेअर नेमला. मग आपण संपूर्ण 7.50 किलोमीटर नाल्याचे सर्वेक्षण केले. आता जे अतिक्रमण हटवित असतांना जे कागदपत्र पुढे आले त्या कागदपत्रावरून असे दिसते की, 52 ते 55 मीटर रूंदीचा

नाला प्रत्यक्षात असायला पाहिजे. त्यादृष्टीने आम्ही तालुका निरीक्षक भूमि अभिलेख या कार्यालयास पत्र दिले की, तुमच्याकडे जे सदरील नाल्याचे रेकॉर्ड आहे ते देण्यात यावे. त्यामुळे आम्हाला मार्कींग करणे सोपे जाईल. त्यांनी लेखी स्वरूपात असे कळविलेले आहे की, आमच्याकडे रेकॉर्ड उपलब्ध नाही. परंतु प्रत्यक्षात अतिक्रमण काढीत असतांना एक दोन लाकांनी त्यांच्या त्यांच्या जागेची मोजणी करून घेतली त्यामुळे असे दिसून येते की, साधारणपणे 52-58 मीटर नाला विड्थ आहे. काही लोकांनी त्या ठिकाणी 5 रूपये व 10 रूपयांच्या बाँडवर जमीनीची विक्री केलेली आहे. तेथील गरीब लोकांना प्लॉट विकलेले आहेत आणि त्या ठिकाणी लोकांनी स्वतःची घरे बांधलेली आहेत. प्रशासनातर्फे गेल्या 8-10 दिवसांपासून आवाहन करण्यात आले की, त्या ठिकाणची अतिक्रमणे हटविण्यात यावे. त्या ठिकाणी सर्व पदाधिकारी सुध्दा आलेले होते. अतिशय आक्रमक पध्दतीने लोक त्या ठिकाणी विरोध करतात. म्हणजे घराला हात सुध्दा लावू देत नाही. मी, मा.उप आयुक्त(प्र) यांना सुध्दा पत्र दिलेले आहे आणि सर्व्हे करून आम्ही किमान 45 मीटर रूंदी असावी असे मार्कींग घरांवर केलेले आहे. मुद्दा असा आहे की, आमच्याकडे रेकॉर्ड नाही. सहा.संचालक नगर रचना या विभागाकडे लेखी पत्र देवून विचारणा करण्यात आली. त्यांचेकडे सुध्दा रेकॉर्ड उपलब्ध नाही. असे ठरविले होते की, टी.आय.एल.आर.ला मोजणीसाठी पत्र द्यावयाचे. चौकशी केली असता पुर्ण नाल्याचे आपल्याला विड्थचे मोजमाप फिक्स करावयाचे असल्यास तातडीने नाल्यात करता येणार नाही. दोन्हीही कडून सर्व्हे करत करत येऊन नाल्याची हद्द निश्चित करावी लागणार आहे. त्यासाठी आपल्याला काही लाख रूपये फिस द्यावी लागणार आहे. टी.आय.एल.आर.ला मोजणी संदर्भात पत्र देण्यात येणारच आहे. दरम्यानच्या काळात मा.महापौर व स.पदाधिकारी यांचे समवेत तेथील नागरिकांशी चर्चा झाली होती. त्या चर्चेमध्ये असे ठरले होते की, 45 मीटर विड्थ आपल्याला पाहिजे आहे. त्याच्यापैकी काही लोकांचे म्हणणे पडले की, सध्या पावसाळा सुरू होणार आहे. लोकांची घरे आता तोडणे योग्य होणार नाही. कमीत कमी रूंदी किती लागणार त्यादृष्टीने 30 मीटरचे ठरले होते. परंतु नागरिकांनी त्यालाही विरोध केला. त्याच्यानंतर पुन्हा मा.महापौर व स.पदाधिकारी त्या ठिकाणी स्पॉटवर आले, त्यांनी लोकांच्या म्हणण्याला मान देवून पुन्हा 20 फुट ठेवावा असे आदेश दिले. या अंतरामुळे किमान पाणी तरी वाहून जाईल असे ठरले होते. त्यातील एकाने सहकार्य केले त्याचे नांव डायमंड गॅरेज असे आहे. त्यांनी लिहून द्यावा लागले. यावेळी सर्व स.पदाधिकारी उपस्थित होते. त्या माणसाची समजून काढुन त्यानी सहकार्य करण्याचे ठरविले. परंतु तिथल्या लोकांचे असे म्हणणे आहे की, तुम्ही आमचे घर तोडण्यापुर्वी आमचे प्लॉट कुठे आहे ते नेऊन दाखवा. म्हणजे आमचे घर बांधकाम तोडून सामान घेऊन जातो. त्यामुळे सर्वसाधारण सभेच्या वेळेस आम्ही बाजुचा सर्व्हे नं.216 सर्व्हे करून त्या ठिकाणी 120 प्लॉटचा ले-आऊट अर्जंट तयार केला. सर्वसाधारण सभेत ऐनवेळचा विषय म्हणुन मांडलेला आहे. मागील सर्वसाधारण सभेमध्ये मंजुरी मिळालेली नाही. त्या लोकांचे म्हणणे आहे की, तुम्ही आमची घरे तोडली तर आम्हास ताबडतोब पुनर्वसन करून द्यावे. यापुढेही आपण आम्हाला मार्गदर्शन करावे म्हणजे पुढील काम करणे सोयीचे होईल.

श्री.पुनमचंद बमणे : मा.महापौर किंवा अन्य पदाधिकारी यांना कुणालाही असे जागेवर लिहून देता येते का?

श्री.अ.साजेद अ.सत्तार : त्यांना मदत करण्याचा दृष्टीकोन समोर होता म्हणुन लिहून दिले. त्यांचा प्रामाणिकपणा होता.

श्री.संजय जोशी : स.सदस्यांनी या ठिकाणी प्रामाणिकपणे असा उल्लेख केला. परंतु आम्ही अप्रामाणिक असे कधीच म्हटलेले नाही. साधारण असा नियम आहे की, एखादा पुल बांधावयाचे असल्यास त्या पुलाची उंची इतकी असते, पुलाची उंची जास्तीत जास्त किती असावी याबाबत शासनाचा एक विभाग आहे. शेवटचे जे पात्र आहे त्या पुलाची रूंदी किती आली त्याचे मार्कींग व्हावयास पाहिजे होते. प्रशासनाच्या मनात आले, तेथील लोकांच्या मनात आले म्हणून आपण 20 फुट करतो. समजा आपण 20 फुटावर बांधले तर खरच आपण पाणी अडवू शकू काय? पाण्याला वाहून जायला जेवढी जागा पाहिजे त्या ठिकाणी 150 फुट असेल तर त्या ठिकाणी भिंत बांधून फायद्याचे आहे. करोडो रूपये त्या ठिकाणी खर्च करून आणि 20 फुटाची नाली बांधून पुढील वेळेला एखादा कुणीतरी येईल आणि त्या नालीवर स्लॅब टाकायचे म्हणुन प्रपोजल आणेल.

श्री.अ.रशीद खान(मामू) : हे काम प्रशासनातर्फे केले जाणार आहे तर नाल्याचे आहे की, खाम नदीचे आहे. 20 फुटाचे नालीचे आपण काय करणार.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : 20 फुटाची नाली काढल्यास दोन्ही बाजुचे प्लॉटींग काढणे सुरू होते. या ठिकाणी कार्यकारी अभियंता(वि.ड्रे.) यांनी खुलासा केलेला आहे की, भूमि अभिलेख या कार्यालयाकडे आणि मनपाकडेही नकाशा उपलब्ध नाही. तर त्या ठिकाणी श्री.मुजाहेद पटेल, बिल्डर यांचेकडे तो नकाशा उपलब्ध आहे. त्या ठिकाणचे जोपर्यंत घरे निघत नाही तोपर्यंत नाल्यातील पाणी निघू शकत नाही.

कार्य.अभि.(ड्रेविइवउ) : श्री.मुजाहेद पटेल, बिल्डर यांचेकडे जो नकाशा आहे तो त्यांचे जागेपुरताआहे. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे त्या ठिकाणी मा.महापौर, स.पदाधिकारी, नागरिक व तेथील पुनर्वसित नागरिक यांचेशी बैठक झाली. जे आपल्याला पाहिजे आहे पूर्ण 45 मीटर. तेव्हा तेवढे घर न तोडता यामध्ये 20 फुटापुरते ट्रेंच करून घ्यावी व पावसाळ्यापुर्वी नाल्याला वाट करून द्यावी असे ठरले. परंतु आपण जे अंदाजपत्रक तयार केलेले आहे आणि 9.00 कोटीला मा.सर्वसाधारण सभेने मंजुरी दिलेली आहे. याबाबत आम्ही इ-टेंडरींग प्रोसेस सुरू केलेले आहे. टेंडरसुध्दा काढलेले आहे. हे 9.00 कोटीचे जे आहे ते अलहिलाल कॉलनी व त्यापुढील भागाचे आहे. हे बांधकाम जे आहे जेथे वस्ती झालेली आहे. त्या ठिकाणी प्राधान्याने काम करावयाचे आहे. पुर्ण नाल्याच्या विड्थला बांधावयाचे आहे.

श्री. मधुकर सावंत : दैनिक सकाळ व लोकमत वृत्तपत्रात बातमी आलेली आहे की, अगोदर प्रशासनाने हा खुलासा करावा की, नदी आहे की नाला आहे. जर नदी असेल तर मनपाच्या रेकॉर्डवर काय नोंद आहे आणि प्रशासन आतापर्यंत काय करीत आहे. मनपाकडे सर्व प्रकारचे नियम असतांनाही प्लॉटींग वाल्यांनी सर्व नियम धाब्यावर बसविले आहेत. 9 व 13 कोटीचे प्रकल्प आपण पाण्यात घालत आहोत काय? माझी सभागृहाला विनंती आहे की, त्या ठिकाणी प्लॉटींग पाडून विकणाऱ्यांवर गुन्हे दाखल करावे. प्रशासनाने या दृष्टीने पाऊल उचलावे असे मला वाटते.

कार्य.अभि.(ड्रेविइवउ) : त्या ठिकाणी संबंधीत लोकांचे पुनर्वसन करणे देखील आवश्यक आहे असा निर्णयआपल्याला घ्यावा लागणार आहे. तिथे प्रत्यक्षात अतिक्रमण हटविण्यास कर्मचारी जातात तेव्हा तेथील लोक तीव्रपणे विरोध करतात. त्यामुळे तेथील लोकांचे पुनर्वसन पहिल्यांदा करण्यात यावे. त्याशिवाय पुढील कोणतीही कार्यवाही करू नये. नसता ते लोक घरे तोडू देणार नाहीत. याबाबतीत अतिक्रमण हटविणेसाठी पुढील कार्यवाही करावी लागणार आहे. या प्रकरणात मार्गदर्शन व्हावे.

श्री.वसंत नरवडे पाटील: शहरातील अतिक्रमणे जेवढे वाढलेले आहेत त्यापैकी किती काढावयाचे ते प्रशासनाने अगोदर ठरवावे. ज्या ठिकाणचे रस्ते मोठ्या प्रमाणातील रहदारीचे आहेत, लोकांना अडथळे होतात तेथील अतिक्रमणे प्रथमतः काढण्यात यावे. प्रत्येक वॉर्डला अतिक्रमणाची एक गाडी द्यावी.त्यांना इंचार्ज द्यावा. अतिक्रमण काढण्यासाठी जबाबदारी दिल्याशिवाय हे काम होणार नाही. यासाठी संबंधीत वॉर्ड अधिकारी यांचेवर जबाबदारी टाकून अनधिकृत बांधकामे होणार नाहीत याची दक्षता घेणे महत्वाचे आहे. यासाठी 4 गाड्या चार वॉर्डाना द्यावे, पैकी एक सिडकोला ठेवावे. मोबाईल गाड्या सकाळी 9.00 पासून रात्री 10.00 पर्यंत फिरणार नाहीत तोपर्यंत शहरातील अतिक्रमण थांबणार नाही. आणि यासाठी स.सदस्य जे प्रश्न सभेमध्ये मांडतात त्याचे निरसन 8-15 दिवसात झाले पाहिजे. उद्याला नैसर्गिक आपत्ती येईल आणि नागरिकांना बाधा पोहोचेल यासाठी प्रशासनाने एक ठाम निर्णय घ्यावा आणि त्याची अंमलबजावणी करावी.

श्री. संजय जोशी : खाम नदीतील अतिक्रमण कोण काढणार आहे. याबाबतची जबाबदारी कोणावर राहणार आहे. आपण सभागृहात चर्चा करतो. उपस्थितीत प्रभारी आयुक्त आहेत. उत्तरे कार्यकारी अभियंता(वि.व ड्रे.) हे देतात. परंतु त्यांना अतिक्रमण काढण्याचा अधिकार आहे काय? यापेक्षा उगीच चर्चा करायला नको.

श्री.वसंत नरवडे पाटील: प्रभारी आयुक्त जरी असले तरी बैठकीत चर्चा केल्यास विकास कामांचे बाबतीत आपण निर्णय घ्यावा आणि प्रशासनाने त्याची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी.

श्री. संजय जोशी : खाम नदीतील अतिक्रमण काढणेच्या संबंधी काय निर्णय होणार आहे. केवळ पदाधिकारी सकाळपासून संध्याकाळच्या 6.00 वाजेपर्यंत प्रत्यक्ष स्थळी जाऊन पाहणी करतात व नंतर निघून जातात. अतिक्रमण काढल्या का जात नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : अतिक्रमण काढण्याचे कोणाचेही धाडस नाही. खर्च मात्र रू.2.00 लाख झालेला आहे.

उप आयुक्त(प्र) : अतिक्रमण काढणे बाबत जे अधिकार प्रदान करणेत आलेले आहेत ते वॉर्ड अधिकाऱ्यांना दिलेले आहेत. याबाबत कार्यकारी अभियंता(ड्रेविइवउ) यांनी दोन दिवसापुर्वीच माझ्याकडे पत्र दिले की, खामनदीमध्ये जे अतिक्रमण झालेले आहे ते काढण्यात यावे. याबाबत त्यांच्याकडील जे काही कागदपत्रे आहेत ते कमिटमेंट नागरिकांना दिलेले आहे. पर्यायी जागा देवू याबाबत आम्ही आजच प्रमुख विभागासोबत बैठक ठेवलेली होती. यामध्ये वॉर्ड अधिकारी आणि कार्यकारी अभियंता यांचे सोबत चर्चा करून निर्णय घ्यावयाचा होता. परंतु ही बैठक आता सायंकाळी 5.00 वा. ठेवलेली आहे. याच्यामध्ये नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने आणि जिवीत व वित्त हानी होऊ नये, हे टाळण्यासाठी याबाबत आम्ही बैठक घेणारच आहोत. यासाठी जी काही कमिटमेंट दिली त्याचा सांगोपांग विचार करून आणि आपण आजच्या स्थायी समितीत जो काही निर्णय घ्याल त्या अनुषंगाने खाम

नदीतील अतिक्रमण काढण्याची कार्यवाही आम्ही करणार आहोत. यामध्ये संबंधीत विभाग प्रमुख आहेत त्यांचे अभिप्राय घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

श्री.अ.रशीद खान(मामू) : कार्यकारी अभियंता(वि.व ड्रे.) यांचे म्हणणे असे आहे की, त्या ठिकाणी अतिक्रमण पाडण्यासाठी गेल्यास ज्यांचे घर आहे तेथील लोक थांबवितात. का थांबवितात कारण त्यांना माहित आहे मनपाची जमीन कुठे आहे. जर मनपाने आपली जमीन दाखविल्यास नागरिक अडविणार नाही. तुम्ही कितीही बैठका घ्या, काहीही उपयोग नाही. यासाठी मनपाने आपली मालकी हक्काचे कागदपत्र दाखविणे आवश्यक आहे. नंतरच कार्यवाही करावी.

श्री.मधुकर सावंत : मा.प्रभारी आयुक्त यांनी आजच्या सभेत जो खुलासा केलेला आहे तो गोलमोल आहे. संबंधीत नागरिकांनी प्लॉट घेवून घरे बांधलेली आहेत आणि पैसे घेऊन विकणारे मालक गप्प आहेत. मनपा प्रशासन अतिक्रमण काढावयासाठी गेल्यास त्यांना म्हणतात की, आमचे पुनर्वसन करा. यामध्ये मा.महापौर व काही पदाधिकारी यांनी तेथील लोकांना लिहून दिलेले आहे. परंतु ज्यांनी प्लॉट पाडून पैसे कमविले त्या लोकांना आपण काय करणार? ते लोक सुटले आहेत. त्यांचेवर काहीही कार्यवाही नाही. याबाबत विनाकारण गोंधळ निर्माण होत आहे. पुनर्वसनासाठी मनपाने आपली कुठलीही जागा देवू नये. ज्या व्यक्तींकडून तेथील लोकांनी प्लॉट घेतलेले आहेत त्यांचेकडून पैसे परत घ्यावे. मनपाने एकही फुट जागा देवू नये. कुणीही व्यक्तीने अनधिकृत प्लॉट पाडून विक्री करायचे आणि प्लॉट धारकांनी अनधिकृत घरे बांधायची. मनपा प्रशासन अनधिकृत घरे पाडावयास गेल्यास ते लोक म्हणतात आमचे पुनर्वसन करा. हा काय प्रकार आहे. असला प्रकार करण्याची काहीही गरज नाही. माझे एकच म्हणणे आहे की, पुनर्वसन करू नये व मनपाने जागा देवू नये.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : खाम नदीतील अतिक्रमणे हे कुणाच्या मेहेरबानीने झाले, यास कोण जबाबदार आहे, अतिक्रमण ज्या वेळेस होत होते त्यावेळी प्रशासन झोपलेले होते काय? जर खाम नदीमध्ये अनधिकृत घरे बांधली जात होती त्यावेळी मनपा प्रशासनाने मालकी म्हणुन त्याच वेळी आळा का बसविला नाही. पुर्वीपासूनच जबाबदारी संबंधीत विभागास देऊन कार्यवाही करणेस भाग पाडावयास पाहिजे. माझी कार्यकारी अभियंता(वि.व ड्रे.) यांना खुलासा करण्यास सांगू इच्छितो की, एक जमीन आहे मिल्ट्रीच्या लोकांची. त्या ठिकाणची प्लॉटींग केलेली आहे. त्या बाबतीत संबंधीत कार्यकारी अभियंता यांना माहिती आहे. त्या ठिकाणी 150 प्लॉट पाडून तेथील लोकांना पुनर्वसन करणार होतो ते कुणी केले.

कार्य.अभि.(ड्रेविइवउ) : मी वारंवार सांगू इच्छितो की, त्या ठिकाणी नाल्याचा जो फ्लो आहे तो फ्लो सुरळीत वाहण्यासाठी किती विड्‌थ पाहिजे त्यादृष्टीने आम्ही सर्व्हेक्षण केलेले आहे. त्या ठिकाणी जमीन किती आहे, प्लॉटींग किती पडले, काय झाले याबाबत मी काहीही कॉमेंटस् करणार नाही. आणि त्या कॉमेंटसशी माझ्या विभागाचा काहीही संबंध नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : त्या ठिकाणी 2 एकर जागेवर प्लॉट पाडून जवळपास 150 पलॉट पाडून मनपाकडून तेथील लोकांचे पुनर्वसन करणार होते याचा खुलासा करावा.

श्री. संजय जोशी : आता पावसाळा लवकरच सुरू होणार आहे. आज 29 तारीख आहे आणि ये रे माझ्या मागल्या असेच होणार आहे. प्रशासनाने अद्यापही कुठलीच कार्यवाही केलेली

नाही. त्यामुळे विनाकारण चर्चा करण्यात अर्थ नाही. या ठिकाणी संबंधीत अधिकारी जबाबदारीने सांगावयास तयार नाही. त्यामुळे वेळ घालवू नये.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : मा.आयुक्त स्वतः खाम नदीच्या ठिकाणी गेले आणि कुणीच त्याची जबाबदारी घेत नाही म्हणजे काय?

श्री. मधुकर सावंत : आजच्या सभेमध्ये चर्चा करण्यासाठी कुणीही जबाबदार अधिकारी नसल्यामुळे या ठिकाणी चर्चा थांबवावी. यामध्ये माझी सूचना अशी आहे की, तेथील नागरीकांना अगोदर विचारा त्यांना प्लॉट पाडून कुणी विकले? त्यांनी कागदपत्रे जमा करा आणि त्यांचेवर गुन्हे दाखल करा. मनपाच्या मालकीच्या जागेवर अनधिकृतरित्या प्लॉट पाडून विकल्याबद्दल गुन्हे दाखल करावे. कारण अनधिकृत प्लॉटींग करणे हा देखील गुन्हा आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : महानगरपालिकेकडे जागेचा नकाशाच नाही तर काय कार्यवाही करणार.

मा. सभापती : त्या ठिकाणी अनधिकृत प्लॉट पाडून बांधकाम केलेले असल्यास संबंधीत जमीन विक्री करणाऱ्यावर नक्कीच कार्यवाही करण्यात येईल.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : पुनर्वसनासाठी तेथील लोकांना जागा द्यावी लागेल. कारण यापुर्वी सुध्दा मनपाने जागा देवू केलेल्या आहेत.

मा. सभापती : या विषयावर आता चर्चा करू नये. हा विषय सर्वसाधारण सभेचा आहे.

श्री. के.व्ही. मोरे : अतिक्रमणा संदर्भाने कायमची काय उपाययोजना करायची यावर कुणीही चर्चा करायला तयार नाही. ते जे प्लॉट विकले शेती मालकाने विक्री केली आणि प्लॉट धारकांनी घेतले त्यांना गरज होती. चूक जरी झाली तरी त्यातून सुधारण्याचे मार्ग आहेत. काय करता येईल, त्यांचे पुनर्वसन करता येईल काय? माझे असे मत आहे की, ज्यांनी प्लॉट विकले त्यांनी पैसे कमविले त्यांचेवर गुन्हे दाखल कराच करा, परंतु गोरगरीबांनी आपल्या पुंजीद्वारे घर उभे केले त्या घराचे पैसे महानगरपालिकेने त्यांना द्यावेत. आणि त्यास जागा द्यावी हा उपाय आहे. हा प्रश्न निकाली निघूच शकत नाही. लहान लहान घरे आहेत. बांधकामाला जास्त पैसे लागलेले नाहीत. आपण त्या नाल्याच्या बांधकामावर खर्च करतो त्यापेक्षा कायमस्वरूपी उपाययोजना करावयाची झाल्यास मा.आयुक्त यांनी 100 मीटर आबादी क्षेत्राच्या आत जेवढी घरे असतील त्या घराच्या मालकांना पैसे मनपाने द्यावेत व प्लॉट द्यावे हा त्यातील मार्ग आहे. यापेक्षाही कितीही शोधण्याचे मार्ग काढले तरी प्रश्न निकाली निघू शकरणार नाही. अतिक्रमणाच्या बाबतीत शहर आणि सिडको असे दोन विभाग करावेत. या ठिकाणी स.स.श्री.दाभाडे यांनी गेल्या एक वर्षापासून सतत पाठपुरावा करीत आहेत. या आवाजाची दखल सभागृहाने घेतलेली नाही. अनेक वेळेस त्यांनी एकनाथनगर येथील अतिक्रमण, दर्गा रोडचे अतिक्रमण त्यांच्या वॉर्डमधील अतिक्रमणे अशा प्रकारे प्रशासनाला वेळोवेळी सुचना केलेल्या आहेत. एकही बैठक त्यांनी तशी न बोलता जावू दिलेली नाही. वेळीच उपाययोजना करून सांगितल्याप्रमाणे अतिक्रमण का काढीत नाही. याबाबत जबाबदार अधिकाऱ्यांनी सभागृहात खुलासा करावा.

श्री. संजय जोशी : सभागृहात बरेचसे अधिकारी गैरहजर आहेत. सहाय्यक संचालक नगर रचना हे कोण आहेत, सभागृहाला माहिती नाही. ते सुध्दा गैरहजर आहेत. त्यांच्या सुटीचा अर्ज मा.आयुक्तांकडे आलेला आहे काय?

उप आयुक्त(प्र) : शासनाच्या नगर रचना या कार्यालयाचे श्री.जोशी यांचेकडे सहा.संचालक नगर रचना पदाचा अतिरिक्त कार्यभार दिलेला आहे. त्यांचेकडे 2-3 चार्ज असल्यामुळे ते सर्वसाधारणपणे दुपारी 3.00 नंतर कार्यालयात येतात.

श्री. संजय जोशी : पहा किती घोर अपमान आहे स्थायी समितीचा. आज आपण बैठक बोलाविली, संबंधीत अधिकाऱ्याकडे 4 चार्ज असल्यामुळे ते बैठकीस उपस्थित राहू शकलेले नाहीत. जरी 4 चार्ज असले तरी बैठकीस उपस्थित रहावयास पाहिजे. सभेमध्ये उत्तरे जरी नाही दिली तरी चालेल. परंतु शारीरिक उपस्थिती असणे आवश्यक आहे. याबाबतचा खुलासा मागविण्यात यावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : मालमत्ता अधिकारी यांचे बाबतीतही खुलासा मागविण्यात यावा.

श्री.संजय जोशी : आपण जसे संबंधीत अधिकारी जागेवर आहेत की नाही याची शिस्त लावली तशी यापुढे एखादा अधिकारी विना परवानगी सभेस गैरहजर राहिल्यास प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी अशा प्रशासनास सुचना द्याव्यात.

श्री.पुरूषोत्तम ठाकूर : अतिक्रमण या विषयावर गेल्या तासाभरापासून चर्चा चालू आहे. परंतु प्रशासन त्याप्रमाणे कार्यवाही करीत नाही. स.स.श्री.रशीद मामू यांनी सांगितल्याप्रमाणे सदस्यांना काही लोक बदनाम करतात. अनेक ठिकाणी अतिक्रमणे झालेली आहेत. माझ्या वॉर्डात मनपाचे ओपन स्पेस आहे. त्या ठिकाणी सुध्दा अतिक्रमण बाबत वेळोवेळी पत्र व सूचना करूनही अद्यापही अतिक्रमणे काढलेली नाहीत. टपऱ्यांचे प्रमाण वाढत आहे. त्या ठिकाणी काही लोक पत्ते खेळतात या सर्व बाबींवर आळा बसणे आवश्यक असून प्रशासनाने कार्यवाही करावी अन्यथा मी उपोषणास बसणार आहे.

डॉ.आशा बिनवडे : गेल्या एक तासापासून आपण अतिक्रमण या विषयावर चर्चा करीत आहोत. अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम हा शहराचा अतिशय सेन्सेटीव्ह विषय आहे. अनेक वर्षापासून या सभागृहात याच विषयावर प्रदीर्घ चर्चा होतात. कार्यवाही मात्र होत नाही. अशा प्रकारची ओरडही होते. शेवटी या सगळ्या चर्चेच्या प्रश्नांतून निष्पन्न काय होणार आहे. अधिकारी नाहीत, रेकॉर्ड उपलब्ध नाही. अशी उत्तरे मिळतात. शेवटी आपल्याला काहीतरी ठोस निर्णय घेणे भाग आहे. वॉर्ड अधिकाऱ्यांना आपण अधिकार प्रदान केल्याचे आपण म्हणतो त्यांचे सेंट्रलायझेशन करा. एकदा आपण म्हणतो डिसेंट्रलाईज करा. काहीतरी करीत राहतो. परंतु प्रत्यक्षात आपल्याला अपेक्षीत परिणाम मिळत नाही. याच बाबतीत कारण काय आहे हे कुठेतरी शोधले पाहिजे. हा विभाग जर का आपल्याला खरोखर सक्षम करावयाचा असेल तर काय उपाययोजना करणार यावर कधीतरी विचार झाला का? हे शहर एवढे वाढते आहे, नागरीकरण वाढते आहे आणि त्यामुळे लोकसंख्येचे प्रमाणही वाढत आहे. राहण्याच्या गरजा अधिक प्रमाणात निर्माण झाल्यामुळे जिथे मिळेल तिथे जागा घेतो, मिळेल तिथे जागा घेवून घरे बांधतो. काहीच निष्पन्न होत नाही. या प्रकरणात आपण किती तास चर्चा करणार आहोत आणि वेळ वाया घालवणार आहोत. तर मला वाटते एकदा कुठेतरी बसुन डिसेंट्रलायझेशनचे सेंट्रलायझेशन करून टाकावे काय, यावर निर्णय होणे आवश्यक आहे. याबाबत शासनाचे निर्णय व नियम आहेत. जेणे करून अनधिकृत बांधकाम बाबत इमारत निरीक्षका पासून संबंधीत अधिकारी यांना जबाबदार धरण्यात यईल. एवढे सगळे कायदे हातात असताना आपण अंमलबजावणी करू शकत नाही. म्हणजे आपण

कुठेतरी कमी पडतो. याचा विचार करतांना मला असे वाटते वॉर्ड अधिकाऱ्यांना त्यांच्या ज्या यंत्रणा आहेत त्या प्रोव्हाईड केल्या तरच सक्षम होऊ शकतील. नुसती यंत्रणा प्रोव्हाईड करून आपल्याला थांबता येणार नाही तर जबाबदारी फिक्स करून त्या त्या अधिकाऱ्यास जबाबदार धरून त्यांचेवर जोपर्यंत कार्यवाही होत नाही, तोपर्यंत काहीही होणे शक्य नाही. आणि हे जर करावयाचे असेल तर आपल्याकडील यंत्रणेचे, गाड्या किती आहेत, काम करणारे कर्मचारी किती आहेत याबाबतचा अहवाल घेऊन त्यात सुधारणा होतात काय ते पाहावे. याबाबतचे उत्तर विचारायचे झाल्यास प्रशासकीय अधिकारी हे किती प्रमाणात सांगू शकतील मला माहित नाही. हे अधिकारी, त्यांचेकडे असलेली यंत्रणा हे सर्व कुठे कमी पडतात हे जरी सांगू शकले तरी पुढे काही आपल्याला करता येईल. तोपर्यंत चर्चा करण्यात काहीच अर्थ नाही. आताच प्रभारी आयुक्तांनी सांगितले की, आम्ही वॉर्ड अधिकारी यांना अधिकार प्रदान केलेले आहेत. परंतु कागदोपत्री अधिकार प्रदान करण्याला काय अर्थ? अधिकार प्रदान करतांना ज्या गोष्टी लागतात त्या प्रोव्हाईड केल्या तरच कृती होईल.

मा. सभापती : सर्व स.सभासदांच्या भावना लक्षात घेता, शहरातील मोठ्या प्रमाणात होत असलेले अतिक्रमण, अनधिकृत बांधकामे त्यासाठी जबाबदार वॉर्ड अधिकारी, इमारत निरीक्षक यांचा सहभाग आहे. त्यामुळे प्रशासकीय विभाग सेंट्रलाईज करून यावर सर्वसाधारण सभेत चर्चा झालेली आहे. ते तपासून स्थायी समितीत झालेल्या चर्चेनुसार हा विभाग सेंट्रलाईज करता येईल काय? याबाबत सर्वसाधारण सभेत शिफारस करण्यात येते.

श्री. संजय जोशी : जेसीबीची किंमत कितीतरी लाखात आहे. आपण दोन चाकी वाहन घेतले तर साधे एक वर्षाची वॉरंटी असते. आणि आपण तर नवीन जेसीबी मशीन घेतलेले आहे. मग कंपनीने एक वर्षाची वॉरंटी दिलेली नाही काय? खराब झाल्यानंतर मशीन ट्रकमध्ये टाकून यांत्रिकी विभागात नेला, स.पदाधिकारी यांनी खराब जेसीबीची पाहणी केली. ती जेसीबी कंपनीला का दिली नाही.

श्री.अ.रशीद खान(मामू) : मनपाने जेसीबी मशीन नव्याने घेतल्याचे सांगितले. परंतु मशीन चोरून आणलेले आहे काय? जर चोरून आणलेले असल्यास पोलीसमध्ये गुन्हा दाखल करावा. ज्या वेळेस पासून जेसीबी मशीन आणलेली आहे एका दिवसातच मशीन बंद झालेली आहे. जेसीबी मशीनला रंग मारले असे वाटते. म्हणजे जुन्या मशीनला रंग मारून ही नवी दाखविण्यासाठी मशीन आणलेली दिसते. याबाबत काही तरी राज आहे. तेव्हा गुन्हा दाखल करावे. पोलीस चौकशी करतील. संबंधीत अधिकाऱ्यांचे वेतनवाढ थांबवावे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : या संदर्भात चौकशी करून खुलासा करावा.

श्री.अ.रशीद खान(मामू) : जेसीबी मशीन खरेदी संदर्भात कोणत्या अधिकाऱ्यानेपुढाकार घेऊन विकत आणले याची माहिती द्यावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : मा.सभापती हे दररोज विविध विभागांना भेटी देवून कर्मचारी वेळेवर येतात किंवा नाही याची तपासणी करतात, त्यांचे अभिनंदन करावे.

श्री. संजय जोशी : कोणत्याही गाडीचे नविन असल्यानंतर बिघाड झाल्यास त्याच कंपनीमध्ये दुरूस्तीसाठी घेऊन जातात. परंतु मनपाने नवीन जेसीबी मशीन नादुरूस्त झाल्याने स्वतःच्या यांत्रिकी विभागात नेऊन दुरूस्ती करण्याचे प्रयत्न केल्यास त्याची वॉरंटी

संपुष्टात येते. याचाच अर्थ आपण जेसीबी मशीन ज्या कंपनीतून आणला त्याची आपल्याला फार आवड होती. आपलेकडे स्कील्ड वर्कर होते म्हणुनच आपण जेसीबी मशीन नादुरूस्त झाल्यानंतर यांत्रिकी विभागात आणले. सदरील मशीन यांत्रिकी विभागात घेऊन जाण्याचे कारण व ती मशीन उघडण्याचे कारण काय याचा सविस्तर खुलासा मागवावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : ज्या अधिकाऱ्यांनी जेसीबी मशीन यांत्रिकी विभागात नेऊन मशीन उघडली त्यांचेवर कार्यवाही निश्चित व्हावी.

श्री.वसंत नरवडे पाटील: मी ज्या सुचना अतिक्रमणाच्या संदर्भात केलेल्या होत्या त्याबाबत आता प्रत्येक वॉर्ड निहाय गाड्या द्याव्यात आणि त्याप्रमाणे कामे तत्परतेने चालू ठेवावी. ठराव होइल त्यास वेळ लागेल. परंतु तत्परतेने कामे सुरळीत व्हायला मार्ग मोकळा.

मा. सभापती : जेसीबी संदर्भात पुढील बैठकीत माहिती देण्यात यावी. यामध्ये जेसीबी कुठल्या कंपनीचा आहे, तो खरेदी करून कुणी आणला, त्या मशीनचा बिघाड कुठे झाला, त्यानंतर ते कोणत्या वर्कशॉपमध्ये नेण्यात आले, त्याची वॉरंटी आहे किंवा नाही, त्याची एकूण किंमत किती होती? आणि आपल्या वर्कशॉपमध्येच का उघडण्यात आला याची सविस्तर माहिती पुढील बैठकीत देण्यात यावी.

श्री.हिंमतराव दाभाडे : सभागृहात होत असलेल्या चर्चे संदर्भात उत्तरेदेण्यासाठी अधिकारी सक्षम नाही आहेत. परंतु माझ्या प्रश्नावर उत्तरे देण्यासाठी विधी सल्लागार आहेत. मा.प्रभारी आयुक्त आहेत. माहिती अधिकार म्हणजे काय? स.नगरसेवकांनाही माहिती अधिकाराखाली काही माहिती विचारली त्या अधिकारात त्यांना किती दिवसात माहिती द्यावी? याबाबत संबंधीत अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

मा. सभापती : संबंधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

विधी सल्लागार : माहिती अधिकारा अंतर्गत माहिती विचारल्यानंतर 30 दिवसाच्या कालावधीत संबंधीत माहिती द्यावी असा नियम आहे.

श्री.हिंमतराव दाभाडे : मी लेखा विभागास माहितीचा अधिकार अंतर्गत माहिती विचारणा केली दि.14.12.2006 रोजी परंतु आताच विधी सल्लागारांनी दिलेल्या माहितीनुसार मला किती दिवसांनी माहिती द्यावी आपण पहावे. जर लेखाधिकाऱ्यांनी माहिती दिली नाही तर आपण काय कार्यवाही करणार आहात. मला लेखाधिकारी विभागातून दि.23.5.2007 रोजी पोष्टाद्वारे माहिती पाठवितात.

मा. सभापती : आपण नियमाप्रमाणे फॉर्म भरून, तिकीट वगैरे लावून अर्ज सादर केला होता काय?

श्री.हिंमतराव दाभाडे : होय. मी त्यावेळी माहितीच्या अधिकारान्वये माहिती विचारणा केली होती. मुथीयान कॉर्नर येथील माधव तुळशीराम घोरपडे यांनी 1983 मध्ये रू.2.80 लाख घेतलेले आहेत. हे पैसे घेतल्यानंतरही तो माणूस स.नं.5 मधील हक्कदार होता 1 एकर 15 गुंठेचा. त्यानंतर त्यांनी सर्व्हे नं.5 मधील 1 एकर 15 गुंठे संपूर्ण जागा त्यांनी विकलेली आहे. परंतु आपले माजी महापौर यांनी शाळेला जागा दिलेली आहे. या जागा दिल्यानंतर सव्हेर नं.5 मधून स.नं.6 मध्ये घातलेले आहे. त्यामध्ये सर्व्हे नं.6 मध्ये त्याची जागाच नव्हती. परंतु त्यांनी सेटलमेंट काय केले याची माहिती नाही. परंतु नगर परिषदेच्या जागेवरती स.सदस्य हे असताना ठराव टाकतात. ठरावाची अंमलबजावणी सभागृहात करून घेतात. आता त्या स.सदस्यांना अधिकार आहे काय?

श्री. मोहन मेघावाले : आपल्याकडे इ-टेंडर पध्दती निघालेली आहे. माझी अशी विनंती आहे की, ही पध्दत वगळून रू.2.00 लाखापर्यंतचे अधिकार रेग्युलाईज करावे आणि ई-टेंडर पध्दत करतो ते रू.5 ते 20 लाखापर्यंतची करावे. तेव्हा ही पध्दत वगळण्यात यावी.

मा. सभापती : या विषयावर पुढील सभेमध्ये चर्चा करावी.

डॉ.आशा बिनवडे : स.स.श्री.दाभाडे यांनी माहितीच्या अधिकारात डिसेंबर मध्ये विचारलेली लेखी माहिती देण्यास तब्बल 5 महिन्यांचा कालावधी संपलेला आहे. तरीही त्यांना अद्याप पावेतो माहिती दिल्या गेली नाही ही बाब नियमाला धरून नाही. त्याशिवाय आपण पाहतो तर गेल्या दोन वर्षापासून या संदर्भात सतत माहिती विचारतात. तरीही पुरेशी माहिती देत नाही याचा अर्थ काय हे समजत नाही.

श्री. संजय जोशी : जर माहितीच्या अधिकारात एखाद्याने विचारलेल्या प्रश्ना संदर्भात अर्ज दिल्यापासून एक महिन्यापर्यंत माहिती दिली नाही तर संबंधीतास अपील करता येते.

मा. सभापती : संबंधीत अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी.

उप आयुक्त(प्र) : माहितीच्या अधिकारात एखादे व्यक्तीने अर्ज सादर केल्यापासून संबंधीत विभागाकडून 30 दिवसांचे आंत जी काही माहिती उपलब्ध असेल ती देणे आवश्यक आहे. त्यानंतरही संबंधीत अर्जदाराने मागितलेली माहिती अपुरी वाटत असल्यास त्यास अपील करण्याचे अधिकार आहेत. अपिल मा.आयुक्त यांचेकडे करता येऊ शकते. त्याशिवाय संबंधीताने विचारलेल्या प्रश्नाचे पुन्हा व्यवस्थीत उकल झालेली नसल्याचे स्पष्ट झाल्यास महाराष्ट्र शासनाचे माहिती आयुक्त यांचेकडेही अपिल दाखल करता येऊ शकते.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : रू.3000/- पर्यंतचे काम महानगरपालिकेला जर द्यावयाचे झाल्यास त्याचे टेंडर काढणे आवश्यक आहे. मा.आयुक्तांनी रू.25 हजार पर्यंतचे, रू.3000/- पासून ई-टेंडर काढण्याची कार्यवाही केली. आता सध्या सभागृहात माहिती देण्यासाठी कुणीही नाही. मनपाने रू.50 करेटीचे कामे दिले. विविध रोडचे कामे देण्यात आलेले आहे. श्रीखंडे एजन्सीला पीएमसी म्हणुन नेमणूक देण्यात आलेली आहे. त्यांना मनपाकडून 2.50% प्रमाणे जवळपास 1.25 कोटी रू. चार्जेस देण्यात येणार आहे. नियमानुसार PMC साठी स्पर्धा होणे अती आवश्यक ठरते. परंतु मनपा अधिकाऱ्यांनी याची दखल घेतलेली नाही आणि म्हणुन श्रीखंडे एजन्सीला PMC म्हणुन नेमणूक देण्यात आलेली आहे. एक तर स.नगरसेवकांचे काम रू.3000/- पर्यंतचे असते आणि येथील अधिकारी त्यांना इकडून तिकडे फिरवतात. विषय क्र.63 बाबत मा.आयुक्त परदेश दौऱ्यावरून परतल्यावर चर्चा करण्यात येणार आहे. एकाच एजन्सीला रू.50 कोटीचे काम देण्यात आले आहे. यामध्ये संबंधीत एजन्सीला रू.1.25 कोटी फिस देण्यात येणार आहे. जर रू.50 कोटीचे काम एजन्सीला द्यावयाचे होते तर टेंडर निघणे आवश्यक होते. आजही एक प्रस्ताव प्रशासनामार्फत आलेला आहे की, PMC नेमणूक करणे आहे आणि त्याचे अधिकार मा.आयुक्त यांना देणे. रू.20.00 लाखाचे कोणतेही कामे द्यावयाचे झाल्यास स्थायी समितीला नाही तर सर्वसाधारण सभेला अधिकार आहे. तेव्हा श्रीखंडे एजन्सीला PMC म्हणून नेमणूक दिलेली आहे. त्याबाबत कोणतेही टेंडर काढलेले नाही. याबाबत पुढील बैठकीत सविस्तर माहिती द्यावी.

श्री.वसंत नरवडे पाटील: आपण औरंगाबाद शहरात एनर्जी सेव्हींग दिवे लावले आणि यामुळे शहरातील लाईट बिलावर किती प्रमाणात फरक पडतो? सध्या मनपा आणि एमएसईबी

यांच्यात वाद चालू आहे. सायंकाळी 5 वाजेपासून ते सकाळी 8 वाजेपर्यंत लाईट चालतात. याच्यामध्ये काही तफावर भरून चालली की आपल्याकडून काम होत नाही किंवा त्याबाबत BOT चा कुठला प्रश्न उपस्थित करायचा. सायंकाळी 5 वाजेपासून सकाळी 8 पर्यंत शहरातील लाईट बंद होत नाही. तेव्हा संबंधीत विभागाला योग्य त्या सूचना द्याव्यात.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : माझा जकात बाबत एक मुद्दा आहे. मुंबई प्रां.मनपा अधि.1949 चे कलम 68 अन्वये दै.लोकमत मध्ये सुध्दा बातमी आलेली होती. दररोज स.पदाधिकारी यांना जकाती संदर्भात फोन येत असतात. काल एक फोन आला. कलम 68 अन्वये मा.आयुक्त हे त्यांच्या अधिपत्याखाली अधिकाऱ्यांना कामाबाबतचे अधिकार प्रदान करू शकतात. परंतु खाजगी एजन्सीला अधिकार प्रदान करणेचे कोणतेही अधिकार मा.आयुक्त यांना नाहीत. शिवाय खाजगी व्यक्तीला स्थायी समिती असो, सर्वसाधारण सभा यामध्येही मंजुरी घेऊन सुध्दा अधिकार प्रदान करता येत नाही. याबाबत कायद्यात तरतूद आहे. यामध्ये जकात एजन्सी हे जकात मालाबाबत काही लोकांची पिळवणूक करतात. एखाद्या व्यक्तीचे रू.2000/- चा माल असल्यास त्यावर रू.10 हजाराचे असेसमेंट करतो. अशा प्रकारचे अधिकार जकात एजन्सीला असू नये. अशा प्रकारचे अधिकार जकात अधिक्षक, जकात निरीक्षकांना असावे. तेव्हा याबाबतची माहिती पुढील बैठकीत सविस्तरपणे द्यावी.

श्री. संजय जोशी : समजा माझ्याकडे व्हॅट नंबर असलेले बील आहे ते रू.20 हजार रूपयाचे असल्यास जकात नाक्यावर मात्र रू.40 हजार हाताने लिहून रू.40 हजारावर जकात वसुली केली जाते. एखादे सामान्य नागरीक म्हणतो कुठे 100-200 रूपयांसाठी भांडत बसावे म्हणून देवून निघून जातो. अशा प्रकारे दररोजचे 100-200 रूपये असे म्हणुन संबंधीत कर्मचाऱ्यांकडे लाखो रूपये जमा होतात. तेव्हा व्हॅटला चॅलेंज करण्याचे अधिकार मनपाला तरी आहेत काय? याबाबत पुढील बैठकीत माहिती द्यावी.

मा. सभापती : स.सदस्य श्री.साजेद व श्री.संजय जोशी यांनी विचरलेली माहिती पुढील बैठकीत संबंधीत विभागाने द्यावी.

श्री.मोहन मेघावाले : वॉर्ड-ब अंतर्गत साफसफाई व फावारणी कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने होते. ते कॉन्ट्रॅक्ट एक वर्षाचे वरील कालावधी झालेला आहे. यामध्ये माझ्या स्वत:च्या वॉर्डात स.स.श्रीमती मसरत बेगम व श्री.रविकांत गवळी यांच्या वार्डातील बराचसा भाग हा सिडकोमध्ये येतो आणि सिडको वॉर्ड-ब मधून कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने साफसफाई होते. ती गेल्या वर्षभरापासून मी संबंधीत अधिकारी यांना सांगूनही साफसफाई होत नाही. त्या भागातील फावारणी करणारे जे कर्मचारी आहेत ते दोन-चार घराला फवारणी केली की, दहा-वीस घरांच्या लोकांकडून स्वाक्षऱ्या घेऊन फवारणी केल्याचे पुरावा ठेवतात. तेव्हा माझ्या वॉर्डातील साफसफाई व्यवस्थीत होत राहील यासाठी जास्त मजुरांकडून काम घ्यावे.

श्रीमती जयश्री किवळेकर : गेल्या एक महिन्यापुर्वी मान्सूनपुर्व सिडकोचे जे नाले आहेत ते कंत्राटी पध्दतीने साफ करून घेणे त्या पध्दतीनुसार वर्क ऑर्डर देवूनही जवळपास 15 ते 20 दिवस झालेले आहेत. तेव्हा वर्क ऑर्डर देवूनही कुठलीच नाले सफाई झालेली नाही. कॉन्ट्रॅक्टर लोकांना माहित आहे की, आपल्यावर कुणाचेही नियंत्रण नाही. त्यामुळे अवकाळी पाऊस जर आला आणि नाल्यात जी घाण आहे ती त्यांना काढावी लागते

ती घाण अवकाळी पावसाने आपोआप निघून जाते. माझ्या वार्डामधून ज्याला कॉन्ट्रॅक्ट मिळालेले आहे त्याच्याशी मी संपर्क साधला परंतु ते भेटत नाही. आणि माझ्या वॉर्डात जे नाले आहेत त्यांना काय माहिती म्हणून सर्व नाले दाखवून सफाई करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे माझ्या वॉर्डात फवारणी व्यवस्थीत होत नाही. फॉगींग मशीन नाही. वॉर्ड ब च्या अधिकाऱ्यांचे यावर नियंत्रण नाही. नोवॉन पावडर नाही. स.सदस्या डॉ.आशा बिनवडे यांनी सांगितल्याप्रमाणे तेच औषध आमच्या प्रभागात फवारले जाते. जनावरांसाठी जे किटक नाशक औषधी आहे तेच आमच्याकडे फवारले जाते ही बाब अतिशय दुर्दैवी होय. फॉगींग कधीही होत नाही. नाल्याची साफसफाई व्यवस्थीत होत नाही. वर्षाचा कॉन्ट्रॅक्ट साफसफाईसाठी दिला जातो. मागील वर्षी ज्यांना कॉन्ट्रॅक्ट दिले होते त्यांनाच याही वर्षी दिलेले आहे. त्यांचेवर आपले कुठलेही नियंत्रण नाही. लेबर वाढविलेले नाही. घंटागाडी फिरत नाही. सुका व ओला कचरा त्यांच्या अटी-शर्ती मध्ये दिलेले असतांनाही वेगळा केल्या जात नाही. त्यामुळे वॉर्डातील समस्यांना सर्वच नागरिक तोंड देत आहेत. आणि ह्यांच्याशी सदस्यांनी कुठे संपर्क करायचा असे अधिकाऱ्यांनी कुठेही म्हटलेले नाही. त्यामुळे वारंवार आम्हा सदस्यांना तोंड द्यावे लागते. त्यामुळे सभागृहात मी विनंती करते की, आता पावसाळा सुरू होणार आहे आणि त्यानंतरही या तिनही गोष्टीवर कार्यवाही करावी.

श्री.अ.रशीद खान(मामू) : औरंगाबादमध्ये एकूण किती नाले आहेत याची माहिती द्यावी.

श्री.मो.जावेद मो.इसाक : आपल्याकडे मलेरीया विभाग होता, आता मलेरीया विभाग कुठे आहे हे समजायला मार्ग नाही. कारण मलेरीया विभागाकडून फवारणी वगैरे करून घेण्याची कार्यवाही करता येते.

कार्य.अभि.(ड्रेविइ व उ) : आपण शहरामध्ये दरवर्षीप्रमाणे नाले सफाईचा जो कार्यक्रम हाती घेतो यावर्षी आपण 24 कामे नाले सफाईचे काढलेले आहेत. त्याचे अंदाजपत्रकीय रक्कम अंदाजे रू.72,62,287/- एवढी आहे. त्यातील बरीचशी कामे अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्याने त्याची एकंदर कॉस्ट काढली तर त्याची रक्कम 49 लाख 91 हजार अशी येते. शहरातील 24 नाल्यांचे काम आपण हाती घेतले. तरी अजून एक दोन नाले सिडको भागातील असल्यास घ्यायची आहेत. कारण आपले अंदाजपत्रकीय तरतुद होती 75 लक्ष. अंदाजपत्रक मात्र 1 कोटी31 लाखाचे तयार केले. अंदाजपत्रकीय तरतुद कमी असल्यामुळे काही अंदाजपत्रक खतविले गेले नाही. नाले सफाईचे आम्ही सर्वांचे निविदा काढलेल्या आहेत. सर्वांना वर्क ऑर्डर दिलेले आहे. स.स.श्रीमती किवळेकर यांच्या वॉर्डात रू.1.50 लक्षचे अंदाजपत्रक आहे. अनिकेत कन्स्ट्रक्शन यांना वर्क ऑर्डर दिलेले आहे. 5-6 दिवसांमध्ये आपले काम पूर्ण होणार आहे. कॉन्ट्रॅक्टर काहीही सांगो, प्रशासनाची पूर्ण जबाबदारी आहे. आम्ही चांगले काम करवून घेऊ.

श्रीमती जयश्री किवळेकर : मान्सूनपुर्व नाले सफाई व्हावयास पाहिजे. कॉन्ट्रॅक्टर म्हणतो पावसाळा सुरू झाला की, बरेचसे नाले सफाई झाल्यासारखीच होते. त्यामुळे मान्सूनपुर्व कामे करणे आवश्यक आहे.

मा. सभापती : नाले सफाईचे काम पावसाळा सुरू होण्यापुर्वीच व्हावयास पाहिजे. तसेच संबंधीत कॉन्ट्रॅक्टरला सुचना द्याव्यात.

श्रीमती जयश्री किवळेकर : सिडको एन-3, एन-4 मधून मधोमध वाहणारा नाला आहे. संबंधीत कॉन्ट्रॅक्टरने मागील वर्षी असेच केले. एक पाऊस आल्यानंतर अर्धा साफ झाला, उरलेले त्यांनी तिथेच ठेवले. त्याला काहीही कुणीही बघितले नाही. तोच परत गाळ पावसाने त्याच नाल्यात गेला. अशा पध्दतीने कामे होत असतील तर बरोबर नाही. स.सदस्यांना व नागरीकांना वेठीस धरल्यासारखे होते.

कार्य.अभि.(ड्रे./वि.) : यावर्षी आम्ही पूर्ण नाले सफाईची खबरदारी घेतलेली आहे. त्यामध्ये चिटींग होणार नाही. दरवर्षी साधारणतः मे-जून मध्ये वर्क ऑर्डर होतात. आम्हाला मार्च पर्यंत बजेट नसते. त्यामुळे अंदाजपत्रक मंजूर होत नाही. हे सुध्दा आम्ही हातोहात सह्या घेऊन टेंडर काढून ताबडतोब वर्क ऑर्डर काढतो.

श्री.संजय जोशी : दरवर्षी हीच प्रोसीजर चालू आहे. आपण नाला सफाईसाठी रू.1.00 कोटी अंदाजपत्रक ठेवतो आणि तेवढे खर्च होतात. म्हणजे गेल्या आठ वर्षापासून 8-10 कोटी रू. या कामासाठी खर्च केले गेले. दरवर्षी स.सदस्यांकडून नाला सफाई झाली एवढी चर्चा होते. यामध्ये काय पध्दत अवलंबीली म्हणजे नाला साफ होईल यापेक्षा काही यंत्रसामुग्री घेतली तर परवडेल.

कार्य.अभि.(ड्रे./वि.) : अशा प्रकारचा विषय सर्वसाधारण सभेमध्ये ठेवला होता. परंतु तो मंजुर झाला नाही.

श्री.संजय जोशी : आता 7 जुनला पाऊस सुरू होईल. नाले साफ होणार नाही. पाणी कमरेएवढे नाल्यात साचेल. त्यामुळेनागरिकांची व प्रशासनाची धावपळ सुरू होईल. प्रशासन जरी प्रामाणिकपणाने धावपळ केली तरी यश येणार नाही असे वाटते.

श्री.हिंमतराव दाभाडे : संबंधीत अधिकाऱ्यांनी माहिती दिली 24 नाल्यांची. तेव्हा 24 नाले कोणते? जेव्हा नाल्याची सफाई केल्या जाते त्या अगोदर गुत्तेदारामार्फत नाल्याची पाहणी करून चौकशी केली जावी. त्या नाल्यात गाळ किती आहे आणि त्या ठिकाणचा गाळ काढल्या जातो काय? आणि जर गाळ काढल्या जात असेल तर तो कुठे टाकला जातो. त्या भागातील स.सदस्यांना दाखवायला पाहिजे की एवढा गाळ काढला. माझे असे निदर्शनास आलेले आहे की, जेव्हा पाणी वाहते त्यावेळी पाणी गढुळ केल्या जाते व त्यातील गाळ काढल्या जातो. फुकटचे पैसे गुत्तेदार हडप करतो आणि गाळ कुठे टाकला ते सुध्दा सांगितले पाहिजे.

मा. सभापती : नाले साफसफाईचे संदर्भात संबंधीत कॉन्ट्रॅक्टरला सुचना द्याव्यात की, ज्या ज्या भागातील नाले असतील त्या भागातील स.सदस्यांचे पत्र घ्यावे आणि 5 जुनच्या आंत शहरातील सर्व नाले साफ करून झाले पाहिजेत. याबाबतचा अहवाल माझेकडे सादर करावा. स.सदस्य श्री.मोहन मेघवाले यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्याबबत वॉर्ड-ब येथील त्यांच्या प्रभागात साफसफाई होत नसेल तर संबंधीत अधिकाऱ्यांनी त्याबाबत खुलासा करावा आणि तेथील गुत्तेदार मोनोपॉली करीत असल्यास त्याचेवर कार्यवाही करण्यात यावी.

श्री.हिंमतराव दाभाडे : माझा वॉर्ड-फ मध्ये येतो. माझ्या वॉर्डात संजयनगर, द्वारकापुरी, तुलसी अपार्टमेंट, एकनाथनगर, फुलेनगर, नागसेननगर येथील एक गल्ली आहे. शाह कॉलनी, भीमपुरा एवढा भाग असुन सध्या माझेकडे 6-6 पुरूष/स्त्री मजूर काम करतात. हा संपूर्ण भाग 12 लोकांकडून साफ करून घ्यावा लागतो. याबाबत नागरिकांची सतत ओरड असते. संबंधीत वॉर्ड अधिकाऱ्यांना सांगितले की मजूर वाढवून द्या. मग मजूर वाढवून का दिल्या जात नाही. काही मजूर कामावर येत नाही.

मा. सभापती : या बैठकीत वॉर्ड अधिकारी उपस्थित नाही. तेव्हा पुढील बैठकीत चर्चा करावी.

श्री.के.व्ही.मोरे : माझ्या वॉर्डात मनपाने चांगले रोड तयार केले आहेत. परंतु मनपाचे सार्वजनिक नळ आहेत त्या नळाचे हजारो लिटर पाणी सारखे रोडवरून वाहात राहते. संबंधीत इंजिनिअरला आम्ही सांगितले की त्या नळांना तोट्या बसवा. त्यांचे म्हणणे आहे की, तेथील लोक तोट्या काढून नेतात. माझे असे म्हणणे आहे की, त्या नळांना वेल्डींग करून तोटी बसवावी जेणे करून काढता येणार नाही. त्यामुळे हजारो लिटर पाणी वाया जाणार नाही आणि त्या ठिकाणी कंट्रोल वॉल्व सुध्दा बसविला जात नाही. असे खेदाने सांगावे लागते. मनपाला सांगावेसे वाटते की, इतर ठिकाणी लोकांना पाणी मिळत नाही आणि या ठिकाणी पाणी वाया जाते. याचा बंदोबस्त संबंधीत अधिकाऱ्यांनी करावा. दुसरे असे की, माझ्या वॉर्डात नाल्याचे काही काम चालू आहे. रू.2.00 लाखाचे काम गेले तीन महिन्यांपासून संबंधीत कॉन्ट्रॅक्टर कामे करीत आहे. फक्त 8-8 दिवस कामे केले आणि ते काम करणारे लोक गायब झाले. तेव्हा संबंधीत अधिकाऱ्यांचा अंकुश त्या गुत्तेदारावर नाही.पावसाळ्याचे दिवस आलेले आहेत. नाल्याचे काम होणे आवश्यक आहे. संबंधीत गुत्तेदाराने नाले खोदून ठेवले आणि लहान लहान मुले त्या ठिकाणी पडतात. यासंबंधी प्रशासनाने दखल घेऊन कार्यवाही करावी.

मा. सभापती : नळांना तोट्या बसवून वेल्डींग करावे व नाले सफाई बाबत सर्व्हे करून कार्यवाही व्हावी.

श्री.हिंमतराव दाभाडे : आपण जे कॉन्ट्रॅक्ट दिलेले आहे नागरीकांची गैरसोय होऊ नये म्हणून. आपण जे नियम घालून दिलेले आहे संबंधीत गुत्तेदारास प्रत्येक दिवशी काय शिक्षा द्यावयास पाहिजे किंवा केली आहे काय? जर केली असल्यास आतापर्यंत गुत्तेदाराकडून मनपात किती रक्कम दंडापोटी जमा झाली. यासाठी बोलत आहे की, शहानुरमियाँ दर्गा रोडवर BOT तत्वावर जे स्ट्रीट लाईटचे काम चालू आहे तेथील लाईट कित्येक दिवसांपासून बंद आहेत. तेथील लाईट चालू का होत नाही, कशासाठी गुत्ता दिला आहे.

मा. सभापती : संबंधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

कार्य.अभि.(ड्रे./वि.) : स.सदस्य श्री.वसंत नरवडे पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे सकाळी 8 पर्यंत लाईट चालू राहतात, ही वस्तुस्थिती मागील आठवड्यापर्यंत होती. कारण पुर्वी एमएसईबी चे लोक त्यांना चालू/बंद करीत असत. एमएसईबी ने सदरील काम आता आपल्याकडे सोपविलेले आहे. गेल्या 8-10 दिवसापासून मी, माझे कनिष्ठ अभियंता सहीत सकाळच्या सत्रात फिरतो व प्रत्यक्षात दाखवितो. आता याबाबत संतुलीत काम होत आहे. आता 8 वाजेपर्यंत सध्या तरी कुठे लाईट चालू नाहीत. पैठणगेट रोडवरील लाईट चालू होते ते मला मान्य आहे. आता त्यावर कंट्रोल मिळविलेले आहे. तसेच संबंधीत कॉन्ट्रॅक्टरला दंड सुध्दा लावलेला आहे. त्यांना आपले लेखी व तोंडी समज दिलेली आहे. जेवढे सकाळी लाईट चालू राहतील तयाप्रमाणे संबंधीत गुत्तेदाराकडून दंड वसुल करून घेऊत. दर्गा रोडवरील लाईटच्या संदर्भात आज पाहणी करण्यात येईल.

श्री.पुरूषोत्तम ठाकूर : लाईटच्या संदर्भात आपण टायमर का बसवून घेत नाही. जेणे करून त्यावर कंट्रोल राहिल. भावसिंगपुराकडे जाताना जो नाला आहे त्या नाल्याला लागून काही घरे आहेत त्या ठिकाणी एक विहिर आहे. त्याला लागून ड्रेनेज लाईन जाते आहे ती

फुटलेली असल्यामुळे ड्रेनेजचे पाणी त्या विहिरीत मुरते. यासाठी तातडीने कार्यवाही व्हावी. काम जरी सुरू केले असले तरी काम थांबलेले आहे. त्या ठिकाणी मंदिर आहे. पावसामुळे मंदिर पडण्याची शक्यता आहे. फॉगींग ची पध्दत बरोबर नाही.

मा. सभापती : संबंधीत अधिकाऱ्यांनी याबाबत लक्ष द्यावे. विषय क्र.17 मंजूर.

**विषय क्र.17 :**

दिनांक **8/5/2007**(का.प.क्र.2) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**ठराव :**

दिनांक **8/5/2007** रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.18 :**

प्रकल्प संचालक यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राच्या उपक्रमाचा भाग म्हणुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर अभिवादन ग्रंथ प्रकाशित करीत आहोत. ग्रंथ छपाईचे काम पूर्णत्वाच्या मार्गावर आहे. महाराष्ट्रातील नामवंत साहित्यिकांच्या लेखांचा या ग्रंथात समावेश करण्यात आला आहे. ग्रंथ संपादनाचे कार्य प्रख्यात साहित्यिक डॉ.गंगाधर पानतावणे हे करीत आहेत. त्यांना रूपये 5000/- मानधन देण्यात येणार आहे. ग्रंथात बाबासाहेबांच्या दुर्मिळ छायाचित्रांचा समावेश करण्यात आला आहे. पुर्वी ग्रांथाची पृष्ठसंख्या 200 गृहीत धरली होती. आता ग्रंथाची पृष्ठसंख्या सुमारे 300 असून ग्रंथाच्या 1500 प्रती छपाई करण्यात येत आहेत. लवकरच प्रकाशन समारंभाचे आयोजन करणे आहे. जाहीर निविदा प्रकाशित करून प्रती ग्रंथ दर रू.195/- दरास मा.आयुक्तांनी मान्यता दिली आहे. वरील छपाईच्या कामावर रू.2,92,500/- खर्च करण्यात येत आहे. लेखकांना प्रत्येकी रू.750/- मानधन देण्यात येत असून त्यांना प्रत्येकी एक ग्रंथ विनाशुल्क व स्मृतीचिन्ह भेट म्हणुन देणे योग्य. नामवंत साहित्यिकांच्या लेखांच्या समावेशामुळे सदर अभिवादन ग्रंथ दर्जेदार होत असुन मा.आयुक्तांच्या सुचनेनुसार प्रती ग्रंथ देणगी शुल्क रू.200/- असावे. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.संजय जोशी : प्रत्येक लेखकांना रू.750/- प्रत्येकी मानधन देण्यात येणार आहे असा उल्लेख आहे. परंतु लेखक किती आहेत याचा उल्लेख नाही. छपाईच्या कामावर रू.2.92 लाख खर्च अपेक्षीत धरले तर 1500 प्रती छपाईसाठी प्रत्येक ग्रंथास रू.975/- एवढी रक्कम होत आहे. तेव्हा यामध्ये मानधनाची रक्कम रू.750/- गृहीत धरली आहे काय?

श्री.वसंत नरवडे पाटील: माझ्या माहितीप्रमाणे रू.2.92 लाखाऐवजी रू.3.81 लाखाचे अंदाजपत्रक येत आहे अशी माहिती आहे. इतर शुल्क म्हणजे कोणते आणि आपण लोकांना देणगी शुल्क रू.200/- ते सुध्दा वसुल करणार आहोत.

मा. सभापती : संबंधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

प्र.प्रकल्प संचालक : छपाईसाठी एका प्रतीस रू.195/- दरास मान्यता व्हावी आणि 1500 प्रती छपाई करायचे असून त्यासाठी 26 लेखकांनी आपले ग्रंथास लेख दिलेले आहेत. त्यांना मानधन म्हणुन रू.750/- प्रत्येकी द्यावयाचे आहे. छपाईसाठी 2.92 लाख खर्च येणार आहे. मानधनाचा खर्च यामध्ये समाविष्ट नाही.

श्री.संजय जोशी : 1500 प्रती छपाई करायचे आहे. जवळपास 1000/- रूपये प्रती ग्रंथ खर्च येतो आणि मा.आयुक्त यांनी रू.200/- ग्रंथाची किंमत ठेवलेली आहे. देणगी मुल्य रू.200/- ठेवलेली आहे. देणगी म्हणजे त्यास टॅक्स लागत नाही. यामध्ये संपादकिय मानधन सुध्दा रू.5000/- गृहीत धरलेले नाही.

उप आयुक्त(प्र) : महाराष्ट्रातील विविध नामवंत लेखकांकडून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जिवनावरील लेख मागविण्यात आले. त्यांचा अभ्यास करून जवळपास 26 लेखकांचे लेख अंतिम करण्यात आले. महानगरपालिका ही एक व्यावसायिक दृष्टीकोन न ठेवता सामाजिक दृष्टकोन ठेवून सर्वसामान्य लोकांनी हा ग्रंथ विकत घ्यावा. तेव्हा व्यावसायिक दृष्टीकोनाचा विचार न करता सामाजिक दृष्टीकोनातून सर्वसामान्य नागरीकांनी हा ग्रंथ विकत घेऊन वाचावा म्हणुन देणगी मुल्य म्हणुन आपण प्रस्ताति केलेले आहे. आणि या प्रस्तावामध्ये छपाईचा खर्च वेगळा. त्याहीपेक्षा मानधन, कार्यक्रम घेण्यात येणार आहे. त्या कार्यक्रमासाठीचे प्रमुख पाहुणे त्यांचा खर्च असे मिळून रू.3.81 लाख गृहीत धरलेला खर्च आहे. याच्यासाठी देणगी मुल्य म्हणून रू.200/- ठेवलेली आहे.

श्री.संजय जोशी : यामध्ये ग्रंथाची किंमत मुल्य देणगी रू.200/- असे ठेवलेले आहे. यामध्ये मुल्य नाही देणगी आहे. म्हणजे देणगी हा शब्द विनामुल्य असतो.

मा. प्र. आयुक्त : सर्वसामान्य माणूस रू.1000/- चा ग्रंथ विकत घेऊ शकत नाही. तेव्हा सर्वसामान्य व्यक्तीने रू.200/- मध्ये सदरील ग्रंथ विकत घेऊन वाचावे हा त्यामागे दृष्टीकोन आहे.

श्री.संजय जोशी : देणगी हा शब्द दर्शविलेला आहे. देणगी ही विनामुल्य असते. तेव्हा देणगी हा शब्दप्रयोग न करता चांगल्या मराठी साहित्यीक यांना विचारून या शब्दाचा अर्थ काय होतो हे विचारूनच शब्दप्रयोग करावा. देणगी असा शब्द असू नये.

श्री.अ.रशीद खान(मामू) : डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जिवनावर मनपातर्फे हे पुस्तक छपाई होत आहे. याबाबत औरंगाबाद शहरातील वर्तमानपत्रात जाहीर केले काय की, डॉ.आंबेडकर यांच्या जिवनावर ग्रंथ निघणार आहे. आपण विचारून छपाई करीत आहात की, आपण लेखकांकडून सांगत आहात लेख द्या आम्ही छपाई करतो. याचा खुलासा करावा. जर आपण हा ग्रंथ छपात आहात तर कुणाला तरी पत्राद्वारे येथील स्थानिक लोकांना जाहीर आवाहन केले असते तर लोकांनी माहिती व प्रत्यक्षात सहवासातील अनुभव दिले असते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर औरंगाबादला जेव्हा आले तेव्हा निजाम सरकारने जमीन कितीमध्ये दिली, रू.1/- प्रमाणे पूर्ण जमीन 100/- रूपयांत दिली. लोकांना वाचण्यात येते की, या ठिकाणी काय झाले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर औरंगाबादला येण्यापुर्वी जामा मस्जीदमध्ये एक होस्टेल होते त्या ठिकाणी 27 दलित मुले शिकावयास होती. अशा सर्व घटनाक्रम आहेत हे लोकांना माहित होणे आवश्यक आहे. त्यावेळेसचे मोरे व श्री.आर.पी.नाथ, जे.पी.सईद हे जिवंत आहेत त्यांनी जामा मस्जीदच्या खोल्यांमध्ये अभ्यास करीत होते हे सर्व लेखांमध्ये उल्लेख होणे आवश्यक आहे. निजाम सरकारने किती जमीन दिली, फ्री जमीन किती दिली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर औरंगाबादला आल्यामुळे कॉलेज सुरू झाले. या ठिकाणावरून मुले मॅट्रीकनंतर हैद्राबादला जाऊ शकत नव्हते म्हणुन डॉ.बाबासाहेबांनी औरंगाबादला कॉलेजची स्थापना केली. हे सर्व अनुभव या ग्रंथात येणे आवश्यक आहे. या ठिकाणी अजुनही बरेचसे लोक आहेत. जे.पी.सईद आहेत ते सांगतात, डॉ.आंबेडकर यांनी आम्हाला तीन दिवस शिकविले. कायद्याचे लेक्चर दिले, त्यांचे अनुभव घेणे योग्य. डॉ.बाबासाहेब आंबेडकर औरंगाबादला जेव्हा यायचे तर छावणीतील 24 नंबरचा बंगला असायचा त्या ठिकाणी ते थांबायचे. त्या ठिकाणी त्यांना जेवण तयार करून देणारा व्यक्ती अजूनही जिवंत आहे. या सर्वांचे

अनुभव कथन या ग्रंथात घ्यावे. या सर्व घटनाक्रमाचे औरंगाबादेतील सहवासाचे कथन या ग्रंथात करावे. तसेच निजाम सरकारचे फोटो महंमदभाई फोटोग्राफर हे नेहमी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे फोटो घेत असत त्यांचेकडील संग्रह घ्यावा. डॉ.बाबासाहेबांचे धोबी, लक्ष्मण धोबी(लक्ष्या) आजही आहे. त्यांची मुलाखत घ्यावी.

श्री.के.व्ही.मोरे : स.सदस्य श्री.रशीद मामू यांनी केलेल्या सूचना योग्य आहेत. त्यांनी मांडणी केलेली आहे ते सत्य आहे ते या ग्रंथात येणे आवश्यक आहे. ग्रंथ छपाईचा निर्णय एकतर्फी घेतलेला आहे तो चुकीचा आहे. वर्तमानपत्रात जाहीर आवाहन करून दुर्मिळ छायाचित्रांचे व सहवासातील अनुभवाचे कथन शहरातील नागरिकांकडून मागवून त्या ग्रंथात छपाई करावी.

श्री. मधुकर सावंत : औरंगाबाद शहरात डॉ.बाबासाहेबांचा बराच कालावधी गेलेला आहे व सहभाग राहिलेला आहे. येथील बऱ्याच लोकांना त्यांच्या सान्नीध्यात सहवास लाभलेला आहे. याचा कुठे तरी उल्लेख होणे आवश्यक आहे. ते पुस्तकामध्ये आले पाहिजे. त्यासाठी माझी विनंती की, वर्तमानपत्रात जाहीरात देवून नागरिकांकडून त्यांचे अनुभव व सहवासातील आठवणी मागवून नंतरच ग्रंथ छपाई करावे.

श्री.पुरूषोत्तम ठाकूर : डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सहवासातील अनेक व्यक्ती या ठिकाणी आहेत. विविध क्षेत्रात कामाला आहेत. मिलींद कॉलेज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर कॉलेज मधील प्राचार्य यांना बोलावून त्यांचेकडील काही अनुभव असतील ते मागवून नंतरच ग्रंथ छपाई करावे.

श्री. संजय जोशी : या ग्रंथासाठी कोण कोण लेखक आहेत त्यांचे नांवानिशी माहिती द्यावी.

मा. सभापती : संबंधीतांनी खुलासा करावा.

समन्वयक : डॉ.बाबासाहेब आंबेडकर अभिवादन ग्रंथ हा वैचारिक ग्रंथ व्हावा. 26 लेख जे आलेले आहेत ते संपूर्ण महाराष्ट्रातून आलेले आहेत. डॉ.गंगाधर पानतावणे, मुंगुळकर, केशव मेश्राम, ज्योती लांजेवार, डॉ.अरूणा लोखंडे, सुशिला मूलजाधव यांच्यासारखे औरंगाबाद मधील सात-आठ लेखकांचे लेख आहेत. आपल्याकडे आर्ट गॅलरी आहे. महंमद भाईकडून फोटो मिळविलेले होते. ते आर्ट गॅलरीत फोटो महंमद भाईचे लावलेले आहेत. जे प्रकाशीत झालेली नाहीत. जे दुर्मिळ चित्रे आहेत. उदा.डा.बाबासाहेब आंबेडकर यांचे जे स्वत:चे भेट कार्ड होते ते सुध्दा आम्ही मिळविले. आमच्या आर्ट गॅलरीत जे चित्र नाहीत किंवा इतरत्र दुर्मिळ चित्र प्राप्त झालीत ती चित्रे व पत्रांचा शोध घेतला. शाहू महाराजांना दिलेले पत्र किंवा शाहू महाराजांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना लिहिलेले पत्र याचा सुध्दा उल्लेख आम्ही त्यामध्ये केलेला आहे. छायाचित्रांचे 10-12 पृष्ठे आम्हीप्रकाशित केलेली आहेत आणि संपूर्ण महाराष्ट्रातून लेख आलेले आहेत. यासाठी वृत्तपत्रातून जाहीर आवाहनही केलेले होते की, डॉ.बाबासाहेबांच्या ज्या काही वस्तु कुणाकडे उपलब्ध असतील त्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र, आमखास मैदान यांचेकडे पाठवावे.

श्री.वसंत नरवडे पाटील: शहरातील अनेक लोकांकडे दुर्मिळ चित्रे व सहवास लाभलेले व्यक्ती आहेत. त्यांचा या निमित्ताने परिचय देणे व संग्रहीत करणे ठिक राहिल. यामध्ये पारले स्टुडिओ, नाथप्रसाद दिक्षीत, महंमदभाई, रवि पेंटर इ. कडून दुर्मिळ छायाचित्रण मिळावून घ्यावे.

श्री.पुरूषोत्तम ठाकूर : ग्रंथ छपाई पूर्ण होण्यापुर्वी एखादी कच्ची प्रत स.सदस्यांना दाखवावी.

श्री.अ.रशीद खान(मामू) : ज्या लेखकांनी ग्रंथासाठी लेख पाठवून सहकार्य केले त्यांनाही ग्रंथ प्रकाशन सोहळ्या प्रसंगी बोलावून यथोचित सत्कार करावा.

मा. सभापती : डॉ.बाबासाहेब आंबेडकर अभिवादन ग्रंथ हा महानगरपालिका औरंगाबाद तर्फे काढला जाणार आहे. या ग्रंथासाठी आताच स.सदस्यांनी ज्या काही सुचना केल्या, ज्यामध्ये औरंगाबाद येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे वेळोवेळी वास्तव्य होते त्या त्या वेळेस त्यांचे समवेतऔरंगाबादेतील ज्या व्यक्तींचा प्रत्यक्षात सहवास आलेला आहे त्यांचेसोबत दुर्मिळ छायाचित्रे किंवा लिखीत पत्रे वगैरे असतील अशा व्यक्तींकडून मागवून त्यांचे मनोगत व प्रत्यक्ष सहवासा बाबत सदरील ग्रंथात नोंद व्हावी. तसे स्थानिक वृत्तपत्रामध्ये अशा प्रकारे जाहीर आवाहन करून मागवून घ्यावे. ग्रंथातील पृष्ठांची संख्या आणखी वाढल्यास त्याच्या संभाव्य खर्चासह या ठिकाणी दुरूस्तीसह प्रस्तावास मंजुरी देण्यात येते.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राच्या उपक्रमाचा भाग म्हणुन प्रकाशित होत असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर अभिवादन ग्रंथासाठी प्रती ग्रंथ देणगी शुल्क रू.200/- निश्चित करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच सभागृहात स.सदस्यांच्या सूचनेप्रमाणे औरंगाबादेतील ज्या व्यक्तींचा प्रत्यक्षात डॉ.आंबेडकरांशी सहवास आलेला आहे त्यांचेसोबत दुर्मिळ छायाचित्रे किंवा लिखीत पत्रे वगैरे असतील अशा व्यक्तींकडून ते मागवून त्यांचे मनोगत व प्रत्यक्ष सहवासाबाबत सदरील ग्रंथात नोंद व्हावी. तसे स्थानिक वृत्तपत्रामध्ये जाहीर आवाहन करून मागवून घ्यावे. ग्रंथातील पृष्ठांची संख्या आणखी वाढल्यास त्याच्या संभाव्य खर्चासह या ठिकाणी दुरूस्तीसह प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.19 :</u>**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेवर वर्ष 2006-07 मध्ये जलशुध्दीकरण प्रक्रियेत आवश्यक असणाऱ्या तुरटी ग्रेड-1 च्या खरेदीच्या अंदाजपत्रक रक्कम रूपये 19.95 लक्ष रक्कमेस मा.स्थायी समितीच्या दिनांक 22.9.2006 रोजीच्या ठराव क्र.115 अन्वये मंजुरी प्रदान करण्यात आली आहे.

मा.स्थायी समितीच्या मंजुरीनुसार वार्षिक तुरटी ग्रेड-1 चा पुरवठा करण्यासाठी महानगरपालिका निविदा सूचना क्र.94/07 दिनांक 1.2.2007 अन्वये निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आली. निविदा स्विकृतीच्या शेवटच्या दिनांकास विक्री झालेल्या चार निविदांपैकी एक निविदाधारकानी निविदा दाखल केली असून त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | नांव | दर | रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | एम.एस.एस.आय.डी.सी.लि., औरंगाबाद | रू.4096.00 प्रति मे.टन | **रू.28,67,200.00** |

वरीलप्रमाणे दर भरलेली एकच निविदा एम.एस.एस.आय.डी.सी.लि., औरंगाबाद यांची प्राप्त झाली असून निविदेचा दर रूपये 4096/- प्रति मे. टन असा आहे. या प्रकरणी इतर शासकीय कार्यालयाकडून माहिती मागविली असता खालील प्रमाणे तुरटी ग्रेड-1 च्या खरेदीचे चालु वर्षातील दर प्राप्त झालेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1. | जिल्हा परिषद, औरंगाबाद | रू.4400/- प्रति मे. टन |
| 2. | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, औरंगाबाद | सध्या ग्रेड-2 तुरटी वापरतात. |
| 3. | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अमरावती | रू.4350/- प्रति मे. टन |

4. नगर परिषद, वैजापुर रू.4275/- प्रति मे. टन

उपरोक्त दरांशी तुलना करता या प्रकरणी रू.4096/- प्रति मे.टन या दराने तुरटी ग्रेड-1 खरेदी करण्याची शिफारस मा. आयुक्तांनी केली आहे. उपरोक्त निविदे अंतर्गत वार्षिक तुरटी ग्रेड-1 चे एम.एस.एस.आय.डी.सी.लि., औरंगाबाद यांच्या रू.4096/- प्रति मे. टन या दराने खरेदी करावयाचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेवर वर्ष 2006-07 मध्ये जलशुध्दीकरण प्रक्रियेत आवश्यक असणाऱ्या तुरटी ग्रेड-1 च्या खरेदीकरीता प्राप्त झालेली एम.एस.एस.आय.डी.सी.लि., औरंगाबाद यांची रू.4096/- प्रति मे. टन या दाराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.20 :**

महानगरपालिकेकडून **एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी सुधार कार्यक्रम (IHSDP)** ही योजना राबविणे आहे. केंद्र शासन पुरस्कृत एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी सुधार कार्यक्रम (IHSDP) या योजनेमध्ये महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील संपूर्ण झोपडपट्ट्यांचे सर्वेक्षण करून अस्तित्वात असलेल्या झोपडपट्टीचे नकाशे, सुनियोजित झोपडपट्ट्यांचे नकाशे हे शहर विकास आराखड्यानुसार सादर करणे, कामाचे सविस्तर अंदाजपत्रके तयार करणे, देण्यात येणारी कामे गुत्तेदाराकडून निविदेच्या अटी शर्तीनुसार पूर्ण करून घेणे, प्रकल्पावर वेळोवेळी देखरेख करणे व त्याबाबत अहवाल सादर करणे. कामाचा प्रकल्प अहवाल तयार करणे, सदरील प्रकल्प अहवाल म्हाडा कार्यालयात दाखल करणे व मंजुरीसाठी त्याचा पाठपुरावा करणे इत्यादी कामे करावयाची जबाबदारी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची राहील.

प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांना वरील कर्तव्ये पार पाडण्यासाठी महानगरपालिकेकडून प्रकल्पाचे अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 1.50% (दीड टक्के) इतकी रक्कम मोबदला स्वरूपात देय राहिल. सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) मध्ये 5% (पाच टक्के) तरतुद ठेवण्यात आलेले असुन त्यास शासनाने मंजुरी दिली आहे. या 5% मधून प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना 1.5% देय राहिल. सदरहू प्रमाणे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणुकी बाबतचे सर्व अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करण्यात यावेत.

तरी **एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी सुधार कार्यक्रम (IHSDP)** या योजनेच्या कामाचा देखरेख कामावर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणुकीसाठीचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.संजय जोशी : विरोधी पक्षनेता यांनी 1.5% फिस बद्दल बोलले ही तरतुद कुठून उपलब्ध होणार आहे.

उप अभियंता- स्लम : हा निधी केंद्र शासनाकडून प्राप्त होणार आहे. सविस्तर प्रकल्प अहवालात 5% तरतुद ठेवण्यात आलेली आहे त्यातून 1.5% देण्यात येईल.

श्री. संजय जोशी : आपले अभियंते सक्षम नाही का? खाजगीकरणाकडे आपण वाटचाल करत आहोत.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : PMC कोण राहणार आहे? त्यासाठी स्पर्धेची गरज नाही का?

श्री.वसंत नरवडे पाटील: या कामासाठी किती निधी उपलब्ध आहे.

श्री.संजय जोशी : PMC ने सर्वेक्षण करायचे, नकाशे तयार करुन अंदाजपत्रक तयार करायचे व नंतर पेपरला देणे. आमच्या अभियंत्यांनी काय करायचे? काम पूर्ण करुन घ्यायची जबाबदारी देखील पीएमसी ची आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : PMC चे नांव काय आहे, किती निविदा आल्या होत्या? किती नकाशे घेतले.

उप अभियंता- स्लम : एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी सुधार कार्यक्रम ही योजना चालू असून प्रत्येक घरास 100-105 घेतो. त्यानंतर सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन म्हाडा मार्फत मान्यतेसाठी मुंबईला पाठविणे व त्यानंतर केंद्र शासनाकडे जाते. सदर कामे लवकर केली तर निधी लवकर मिळणार. सविस्तर प्रकल्प अहवाल स्वत: तयार करुन मंजुरीसाठी 3 झोपडपट्ट्यांच्या मंजुरीसाठी पाठविण्यात आला. त्यात राहूलनगर, ब्रिजवाडी, आंबेडकरनगर असून उर्वरीत वसाहतींचा सर्व्हे चालू आहे. सर्व्हेचे काम पूर्ण केले, प्रत्येक घराचे मोजमाप घेण्यात आले असून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन पाठवावयाचा आहे. महाराष्ट्रातील इतर महानगरपालिकांनी 2.5% दिले. आपण 1.5% प्रस्तावित करत आहोत.

श्री.संजय जोशी : शासनाकडून मंजुरी आली का? नामंजूर झाले तर 1.5% कोण देईल? मंजुरी आणायची जबाबदारी कुणाची राहिल? आपले अधिकारी यांची जबाबदारी काय राहिल.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : PMC ची नियुक्ती झाली का.

उप अभियंता- स्लम : स्थायी समितीच्या ठरावाप्रमाणे 100+5 प्रमाणे सर्वेक्षण करण्यासाठी PMC ला मंजूरी झालेली आहे. त्याप्रमाणे सर्व्हे झालेला आहे. स्लम भागात एक कनिष्ठ अभियंता आहे व 53 घोषीत झोपडपट्ट्या आहेत.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : PMC साठी स्पर्धा झाली का, रु.3000/- च्या वर निविदा काढणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे निविदा काढण्यात आल्या का? निवड कशी केली. आयुक्तांना अधिकार आहे का? प्रस्ताव स्थगित ठेवावा.

मा. सभापती : सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात येतो.

श्री.के.व्ही.मोरे : ही कल्याणकारी योजना आहे. ही याजना राबविण्यासाठी आयुक्त तत्पर आहेत. स्थगित करु नका, विकासाला वेग येऊ द्या.

श्री. संजय जोशी : स.सदस्य श्री.मोरे यांचे म्हणणे योग्य आहे. शासनाचा निधी परत गेला तर पुन्हा येणार नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : PMC नेमावी म्हणून केंद्र शासनाची अट आहे का?

उप अभियंता- स्लम : यासाठी प्रयत्न करणारी आपली एकमेव महानगरपालिका आहे. केंद्र शासनाकडून 12 कोटी मंजूर झालेले आहेत. PMC ला आपण 1.5% प्रमाणे दिलेले नाही. 100+5 प्रती घराप्रमाणे दिले. आराखडा व प्रकल्प अहवाल तयार केला. राज्य शासनाकडून आणि केंद्र शासनाकडून त्यास मान्यता मिळाली.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : 1.5% प्रमाणे 18 लाख द्यावे लागतील. रु.3000/- च्या वर निविदा काढणे आवश्यक आहे. PMC साठी निविदा काढली का?

श्री.वसंत नरवडे पाटील: दलित वस्ती सुधार योजनेच्या निधीसाठी स्पष्टीकरण व्हावे. तीन स्लमसाठी 12 कोटी मिळाले की हा प्रस्ताव 53 स्लमसाठी आहे?

मा.सभापती : सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.21 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, सुतगिरणी ते काबरानगर रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.12,21,900/- चे असून दिनांक 16.8.2006 रोजी विषय क्र.70 नुसार कामाच्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळालेली आहे. या कामाकरीता वर्तमानपत्रात निविदा सूचना प्रसिध्द करून निविदा मागविल्या असता या कामाकरीता श्री.डी.अजितसिंग यांची एकच निविदा प्राप्त झाली व ठराव क्र.215 दि.24.1.2007 नुसार श्री. राजेंद्रसिंग अजितसिंग यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 11% जास्त दराची निविदा मंजुर करण्यात आलेली आहे. श्री.डी.अजितसिंग यांचे दिनांक 30.12.2006 रोजी निधन झालेले आहे. त्यामुळे केलेली निविदा प्रक्रिया रद्द न करता व कामाची आवश्यकता/निकड व गरज लक्षात घेता तसेच नवीन निविदा काढून लागणारा वेळ विचारात घेता सदरचे काम राजेंद्रसिंग डी.अजितसिंग यांच्याकडून उपरोक्त मंजुर दरानुसारच करून घेण्याकरीता मा.आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे. श्री.राजेंद्रसिंग डी.अजितसिंग हे सार्वजनिक बांधकाम खात्याचे वर्ग-4 मध्ये नोंदणीकृत कंत्राटदार असून ते रू.90.00 लक्ष रक्कमेची कामे करू शकतात. राजेंद्रसिंग डी.अजितसिंग हे डी.अजितसिंग यांचे पुत्र आहेत. त्यानुसार श्री.राजेंद्रसिंग डी.अजितसिंग यांच्याबरोबर करारनामा करून काम करून घेण्यात आलेले आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे कलेली कार्यवाही तसेच राजेंद्रसिंग डी.अजितसिंग यांच्याकडून अं.प.दरापेक्षा 11% जास्त दराने काम करून घेण्याबाबतचा प्रस्ताव कार्योत्तर मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सुतगिरणी ते काबरानगर रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी मंजूर निविदाधारक श्री.डी.अजितसिंग यांचे दिनांक 30.12.2006 रोजी निधन झालेले असल्याने सदरील काम व त्यांचे नांवे मंजूर इतर कामे त्यांचे पुत्र राजेंद्रसिंग डी.अजितसिंग यांच्याकडून मंजूर दरानुसार करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.22 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.26 अंतर्गत विविध स्वयंविकसित गृहनिर्माण संस्थे अंतर्गत रस्त्याचे खडीकरण करणे या कामाचे र.रू.15,93,600/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त असून निविदा पत्रके मागविली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 7 निविदापत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी 4 निविदा पत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | आर.के. कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 38.91% कमी दराने |
| 2. | कुलवंतसिंग | अं.प.दरापेक्षा 22% कमी दराने |
| 3. | रे कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 17.27% कमी दराने |
| 4. | आर.बी. रूडसमुद्र | अं.प.दरापेक्षा 7% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी आर.के. कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 38.91% ने कमी आहेत. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर करण्याचे आदेशित केलेले आहे.

तरी आर.के. कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 38.91% कमी दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.अ.रशीद खान(मामू) : सदरील कामासाठी पुन्हा निविदा मागवाव्यात.

मा. सभापती : या कामाकरीता फेरनिविदा काढण्यात याव्यात.

**ठराव :**

सदरील कामासाठी फेरनिविदा मागविण्यात याव्यात असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.23 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.आंबेडकरनगर(स्लम) येथील ग्रीव्हज् कंपनी समोरील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.16,92,500/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती सभेची दि.6/2/2007 रोजी मंजुरी प्राप्त आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता तीन निविदा दर भरून प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा उघडण्यात आल्या असता खालील प्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1. | मे. आदीनाथ कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने |
| 2. | मे. अरोरा कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने |
| 3. | मे. ए. एस. कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 4% जास्त दराने |

उपरोक्त दराची तुलना केली असता दोन निविदा सारख्या दाराच्या असल्यामुळे दोन्ही ठेकेदारामार्फत फेर दर बंद पाकीटात मागितले असता मे.अरोरा कन्स्ट्रक्शन यांचे दर 0.10% कमी दराने मंजूर करण्यात आले आहेत.

तरी सदर कामासाठी मे.अरोरा कन्स्ट्रक्शन यांचे 0.10% कमी दराची निविदा मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.आंबेडकरनगर(स्लम) येथील ग्रीव्हज् कंपनी समोरील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया कमी दराचे निविदाधारक मे.अरोरा कन्स्ट्क्शन यांचेकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 0.10% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.24 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.ब्रिजवाडी स्लम येथे नाला संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी सा.बां. विभागचे दरसूची 2005-2006 नुसार तयार केलेले अंदाजपत्रक र.रू.15,00,000/- च्या कामासाठी सर्वसाधारण सभेची दि.11.8.2006 रोजी मंजुरी प्राप्त आहे. सदर कामाचा खर्च नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत सन 2006-2007 या आर्थिक वर्षात प्राप्त झालेल्या अनुदानातून प्रस्तावित आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता पाच निविदा दर भरून प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा पत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1. | मे. अमन असोसिएटस् | 9.20% जास्त दराने |
| 2. | मे. सत्यम कन्स्ट्रक्शन | 11.99% जास्त दराने |
| 3. | मे. शेख एम.नजीब उल हक | 13.99% जास्त दराने |
| 4. | मे. एल.के. कन्स्ट्रक्शन | 18.99% जास्त दराने |
| 5. | मे. युनिव्हर्सल इंजिनिअर्स अँड कॉन्ट्रॅक्टर्स | 20.15% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा मे.अमन असोसिएटस् यांची असून ती अं.प.दरापेक्षा 9.20% जास्त दराची आहे. करीता मे.अमन असोसिएटस् यांची अं.प.दरापेक्षा 9.20% जास्तदराची निविदा मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.ब्रिजवाडी स्लम येथे नाला संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची व अं.प.दरापेक्षा 9.20% जास्त दराची मे.अमन असोसिएटस् यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.25 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.नारेगांव (स्लम) नजीक नाल्यावर आर.सी.सी. कल्व्हर्ट बांधणे/संरक्षित भिंत बांधणेच्या कामाचे अंदाजपत्रक रू.25,00,000/- चे असून या कामासाठी निविदा मागविण्यात आल्याअसता एकूण 6 भरलेली निविदापत्रके प्राप्त झाली. सदर निविदांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री.सय्यद समीउद्यीन रजवी | 12.297% कमी दराने |
| 2. | मे. अमन असोसिएटस् | 9.00% जास्त दराने |
| 3. | मे. सत्यम कन्स्ट्रक्शन | 15% जास्त दराने |
| 4. | मे. एल.के. कन्स्ट्रक्शन | 20% जास्त दराने |
| 5. | श्री.अब्दुल खदीर | बंद पॉकेट |
| 6. | मे. शहा कन्स्ट्रक्शन | बंद पॉकेट |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा श्री.सय्यद समीउद्यीन रजवी यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा 12.297% कमी दराची आहे.

करीता श्री.सय्यद समीउद्यीन रजवी यांची अं.प.दरापेक्षा 12.297% कमी दराची निविदा मंजुरीस्तव विचारार्थ सादर. सदरील कामाचा खर्च नागरी दलित वस्ती सुधारणा योजना सन 2006-07 या लेखा शिर्षा अंतर्गत प्रस्तावित आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.नारेगांव (स्लम) नजीक नाल्यावर आर.सी.सी. कल्व्हर्ट बांधणे/संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 12.297% कमी दराची श्री. सय्यद समीउद्यीन रजवी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.26 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.आंबेडकरनगर स्लम येथील मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सा.बां. विभागाचे दरसूची सन 2005-2006 नुसार तयार केलेले अंदाजपत्रक रक्कम रूपये 9,94,200/- च्या कामासाठी सर्वसाधारण सभेची दि.11/8/2006 रोजी मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर कामाचा खर्च नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत सन 2006-07 या आर्थिक वर्षात प्राप्त झालेल्या अनुदानातून प्रस्तावित आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता

एक निविदापत्रक दर भरून प्राप्त झालेले आहे. प्राप्त निविदा उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत.

1. मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कं. 15% जास्त दराने

प्राप्त झालेली मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कं. यांची 15% जास्त दराची निविदा असून सदर निविदा दराचे प्रचलित दराप्रमाणे तुलना केली असता 11.69% जास्त दराने मंजुरीस्तव शिफारस आहे. अंदाजपत्रक र.रू.9,94,200/- ला प्रशासकीय मंजुरी प्राप्त आहे. निविदेस 11.69% जास्त दराने मंजुरी मिळाल्यानुसार अंदाजपत्रक रक्कम रूपये 11,10,422/- एवढे होत आहे. करीता अंदाजपत्रक रक्कम रूपये 11,10,422/- च्या मंजुरीस्तव व मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कं. यांची अं.प.दरापेक्षा 11.69% जास्त दराची निविदा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.अ.साजेद अ.सत्तार : मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कं. यांना दुसऱ्या कामामध्ये 10 हजार प्रति दिवस दंड आकारण्यात येत आहे. त्यांना काम देवून काय उपयोग होणार.

उप अभियंता- स्लम : सुमारे 10 लाखाचे काम आहे, 8 दिवसांत पूर्ण करतील.

डॉ.आशा बिनवडे : माझ्या वॉर्डात सेव्हन हिल ते गजानन महाराज मंदीर रस्त्याचे काम हीच एजन्सी करीत आहे. 6 महिन्यापुर्वी या कामास मंजुरी झाली परंतु आजपर्यंत काम सुरु झालेले नाही. त्यामुळे पॅचवर्क करावे लागले. 100 कोमे घेऊन कामे होत नसतील तर याबाबत विचार करावा. माझ्या वॉर्डातील काम कधी होणार? ते सुरु झाल्याशिवाय हे काम करण्यात येऊ नये.

श्री.वसंत नरवडे पाटील: वर्क लोड किती आहे.

श्री.पुरुषोत्तम ठाकूर : मी माहितीच्या अधिकारात माहिती घेतलेली आहे. सदर एजन्सीने अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराने कामे घेतलेली आहेत. त्यांनी एकही काम चांगले केलेले नाही. काम बरोबर करीत नाही, फेरनिविदा करावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : सेव्हनहिल ते गजानन महाराज मंदीर रस्त्याच्या कामासाठी 6 महिने झाले काम का केले नाही?

श्री. संजय जोशी : कार्यकारी अभियंता यांनी संबंधीत ठेकेदारांना बोलावून सूचना द्यावी की यापुर्वीचे काम सुरु करावे. या अटीसह मंजुर करावा.

मा. सभापती : पुर्वीचे जे काम प्रलंबीत आहे ते चालू करावे, त्यानंतरच या कामाचे कार्यादेश देण्यात यावेत. प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.आंबेडकरनगर स्लम येथील मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेली मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची अं.प.दरापेक्षा 11.69% जास्त दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तथापी संबंधीत एजन्सीने पुर्वीचे प्रलंबीत काम प्रथम सुरू करावे त्यानंतर या कामाचे कार्यादेश देण्यात यावेत. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.27 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, नेहरू बाल उद्यान, दिल्लीगेट येथे स्व.राजीव गांधी यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणे या कामाचे अंदाजपत्रक र.रू.9,99,600/- चे तयार करण्यात आलेले आहे. सदरील काम गुत्तेदार श्री.सुनील देवरे यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदर काम करतांना वास्तुशास्त्रज्ञ यांचे सल्ल्यानुसार काही बाबींच्या

परिमाणात वाढ झालेली आहे. तसेच काही अतिरिक्त बाबी करणे आवश्यक असल्याने मुळे अंदाजपत्रकात रक्कम रू.6,50,496/- ची वाढ होत असून सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.16,50,096/- होत आहे. सदर कामास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर करण्याचे आदेशीत केले आहे.

तरी सदरील कामाचे रक्कम रू.16,50,096/- चे सुधारीत अंदाजपत्रकास व मुळ कंत्राटदाराकडून मान्य दराने काम करून घेणेचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नेहरू बाल उद्यान, दिल्लीगेट येथे स्व.राजीव गांधी यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणे या कामामध्ये काही बार्बीच्या परिमाणात वाढ झालेली असल्याने काही अतिरिक्त बाबीचे अंदाजपत्रक रक्कम रू.6,50,496/- ची वाढ होत असल्याने, रक्कम रू.16,50,096/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास तसेच सदरील काम मुळ कंत्राटदार श्री.सुनील देवरे यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.28 :**

शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, खाम तलाव मत्स्य व्यवसाय करण्यासाठी जा.क्र.मनपा/मामअ/584/2007, दिनांक 17-4-2007 रोजी तिसऱ्या वेळेस स्थानिक वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार दिनांक 17-4-2007 रोजी प्रत्यक्ष बोलीमध्ये दोन व्यक्तींनी भाग घेतला, त्याचा तपशील खालील प्रमाणे.

1. श्री.लक्ष्मण भोलाराम बुंदीले रक्कम रू.84,000/- प्रती वर्ष.
2. श्री.शेख लतीफ शेख अमीर रक्कम रू.85,000/- प्रती वर्ष.

परंतु या अगोदर बोलीत श्री.शेख लतीफ शेख अमीर यांनी प्रती वर्ष रू.1,23,000/- बोली बोलली होती व श्री.लक्ष्मण भोलाराम बुंदीले यांनी लेखी अर्ज देवुन रू.1,51,786/- प्रती वर्ष रक्कम देतो असे लेखी कळविले होते. त्यामुळे सदरील बोली रक्कम रू.85,000/- फार कमी असल्याने मा.आयुक्त यांनी दि.19-5-2007 रोजी संबंधीतास वाटाघाटीसाठी प्रत्यक्ष बोलविले. श्री.लक्ष्मण भोलाराम बुंदीले यांना रक्कम रू.1,51,786/- प्रती वर्ष देण्यास तयार आहेत का, असे विचारले असता त्यांनी असमर्थता दर्शविली. तेव्हा दुसरे बोलीधारक श्री.शेख लतीफ शेख अमीर यांना विचारणा केली असता त्यांनी बोली रू.1,60,000/- प्रती वर्ष देण्याचे मान्य केले. जी महानगरपालिकेने ठेवलेल्या रू.15,720/- प्रती वर्ष या आधारभुत रक्कमेपेक्षा जास्त आहे.

त्यामुळे श्री.शेख लतीफ शेख अमीर यांना दि.1-6-2007 ते 31-5-2010 पर्यंत या तीन वर्षांसाठी मत्स्य व्यवसाय करण्यासाठी ठेका देणेची मान्यता मा.आयुक्तांनी दिली आहे. मा.स्थायी समितीची मान्यता झाल्यास संबंधीताकडून पुढील प्रमाणे पुर्तता करून घेण्यात येईल. पहिल्या वर्षा करीता रक्कम रू.1,60,000/- व पुढील दोन वर्षाची मुदतवाढ दरवर्षी बोली रक्कम रू.1,60,000/- च्या 10% वाढ करून नुतनीकरण करण्यात येईल. रक्कम रू.80,000/- ची बँक गॅरंटी तीन वर्षासाठी घेणेत येईल. पहिल्या वर्षी व नुतनीकरणासाठी त्यावेळी लागू असलेल्या एकूण रक्कमेच्या 50% रक्कम भरून घेण्यात येईल. करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे खाम तलाव मत्स्य व्यवसाय करण्यासाठी झालेल्या लिलाव बोलीमध्ये भाग घेतलेले श्री.शेख लतीफ शेख अमीर यांनी बोली रू.1,60,000/- प्रती वर्ष देण्याचे मान्य केले असल्याने श्री.शेख लतीफ शेख अमीर यांना दि.1-6-2007 ते 31-5-2010 पर्यंत या तीन वर्षासाठी मत्स्य व्यवसाय करण्यासाठी प्रस्तावात नमुद केलेल्या अटीशर्तीनुसार ठेका देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.29 :**

शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, इंदिरानगर बायजीपुरा येथील सांस्कृतिक सभागृह ज्याचे क्षेत्रफळ 91.00 चौ.मी. आहे, पाच वर्षासाठी भाडेतत्वावर देण्यासाठी प्रशासकीय मान्यतेनुसार जा.क्र.मनपा/मामअ/593/2007 दिनांक 18-4-2007 रोजी स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा/बोली केली असता दिनांक 24-4-2007 रोजी बोलीत एका व्यक्तीने भाग घेतला, त्याचा तपशील खालील प्रमाणे.

1. साईसेवा क्रिडा बहुउद्देशीय मंडळ यांच्यातर्फे सचिव श्री.गणेश फुलमामडीकर यांनी रू.2000/- प्रती माह बोली बोलली आहे.

मा.स्थायी समितीचे ठराव क्र.317 दिनांक 20-3-2007 अन्वये मान्यता झाल्यानुसार सदरील हॉलसाठी भाडे प्रती माह रू.1000/- ठेवले होते. साईसेवा क्रिडा बहुउद्देशीय मंडळ यांच्यातर्फे सचिव, श्री.गणेश फुलमामडीकर यांनी रक्कम रू.2000/- जास्तीची बोली बोलली असल्याने त्यांच्या बोलीस मा.आयुक्तांनी मान्यता दिली आहे. मा.स्थायी समितीची मान्यता झाल्यास संबंधीताकडून एका वर्षाचे आगाऊ भाडे रू.24,000/- व अनामत रक्कम रू.24,000/- तसेच सेवा शुल्करू.5/- प्रती चौ.मी. प्रती माह प्रमाणे वसूल करण्यात येईल व त्यानंतर करारनामा करून घेवुन भाडेतत्वावर देण्यात येईल. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इंदिरानगर बायजीपुरा येथील सांस्कृतिक सभागृह पाच वर्षासाठी भाडेतत्वावर देण्यासाठी साईसेवा क्रिडा बहुउद्देशीय मंडळ यांच्यातर्फे सचिव श्री.गणेश फुलमामडीकर यांनी रू.2000/- प्रती माह बोली बोलली असल्याने संबंधीताकडून एका वर्षाचे आगाऊ भाडे रू.24,000/- व अनामत रक्कम रू.24,000/- तसेच सेवा शुल्करू.5/- प्रती चौ.मी. प्रती माह प्रमाणे आकारणी करून भाडेतत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.30 :**

शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, गारखेडा येथील सांस्कृतिक हॉल ज्याचे क्षेत्रफळ 111.32 चौ.मी. आहे. न.भु.क्र.15302/12 हा हॉल पाच वर्षासाठी भाडेतत्वावर देण्यासाठी जा.क्र.मनपा/मामअ/593/2007 दिनांक 18-4-2007 रोजी स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देवून बोली ठेवली असता दिनांक 24-4-2007 रोजी निविदा/बोली होऊ शकली नाही.

मा.स्थायी समितीचे ठराव क्र.317 दिनांक 20-3-2007 अन्वये मान्यता झाल्यानुसार सदरील हॉलसाठी भाडे प्रती माह रू.1000/- ठेवले होते. पण बोलीत कोणीही भाग घेतलेला नाही. दि.18-5-2007 रोजी सचिव, स्वामी विवेकानंद व्यायामशाळा, श्री.हुसेन जमादार यांनी विनंती अर्ज सादर केला आहे व त्यांनी सदरील हॉलसाठी प्रती माह रू.1200/- व नियमाप्रमाणे अनामत सेवा शुल्क देण्यास तयार आहे. त्यानुसार प्रस्तावित केले असता त्यास प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. महानगरपालिकेने सदरील

हॉलसाठी आधारभुत भाडे रू.1000/- प्रती महिना ठेवली होती व सचिव, स्वामी विवेकानंद व्यायामशाळा यांनी रक्कम रू.1200/- प्रती माह देण्यास मान्य केल्याने महानगरपालिकेच्या आधारभुत भाड्यापेक्षा जास्त असल्याने संबंधीताकडून रू.1200/- प्रतीमाह प्रमाणे बारा महिन्याचे आगाऊ भाडे रू.14,400/- व अनामतरक्कम रू.14,400/- तसेच सेवा शुल्करू.5/- प्रती चौ.मी. प्रती माह प्रमाणे वसूल करण्यात येवून करारनामा करून घेण्यात येईल. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गारखेडा येथील सांस्कृतिक हॉल पाच वर्षासाठी भाडेतत्वावर देण्यासाठी सचिव, स्वामी विवेकानंद व्यायामशाळा, श्री.हुसेन जमादार यांनी रू.1200/- प्रती माह देण्यास तयार असल्याने असल्याने संबंधीताकडून रू.1200/- प्रतीमाह प्रमाणे बारा महिन्याचे आगाऊ भाडे रू.14,400/- व अनामतरक्कम रू.14,400/- तसेच सेवा शुल्करू.5/- प्रती चौ.मी. प्रती माह प्रमाणे आकारणी करून भाडेतत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.31 :**

शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, न्यु समर्थनगर येथील महानगरपालिकेची व्यायामशाळा ज्याचे क्षेत्रफळ 69.96 चौ.मी. असून पाच वर्षासाठी भाडेतत्वावर देण्यासाठी प्रशासकीय मान्यतेनुसार जा.क्र.मनपा/मामअ/593/2007 दिनांक 18-4-2007 रोजी स्थानिक वर्तमानपत्रात जाहीर लिलाव/निविदा सूचना प्रसिध्दीस दिली असता व प्रत्यक्षात लिलाव/जाहीर निविदा दि.24-4-2007 रोजी लिलाव ठेवला असता खालील बोली धारकाने बोलीत भाग घेतलेला आहे.

1. न्यु समर्थ सांस्कृतिक क्रिडा मंडळ औरंगाबाद यांचे वतीने ॲड.श्री.गोरख मोरे - रू.9975/- प्रती माह.
2. छत्रपती शिवाजी मंडळ व व्यायामशाळा यांचे वतीने श्री.राजेंद्र जाधव - रू.9950/- प्रती माह.

महानगरपालिकेच्या व्यायामशाळेचे आधारभुत भाडे रू.1000/- ठेवले होते. परंतु न्यु समर्थ सांस्कृतिक क्रिडा मंडळ, औरंगाबाद यांच्या वतीने ॲड.श्री.गोरख मोरे यांनी रू.9975/- प्रती माह जास्तीची बोली बोललेली आहे. जी महानगरपालिकेने ठेवलेल्या आधारभुत रक्कमेपेक्षा जास्त आहे. मा.आयुक्त यांनी त्यास मान्यता दिली आहे. मा.स्थायी समितीची मान्यता झाल्यास संबंधीताकडून रू.9975/- प्रती माह प्रमाणे बारा महिन्याचे आगाऊ भाडे रू.1,19,700/- व अनामत रक्कम रू.1,19,700/-, सेवा शुल्क रू.5/- प्रती चौ.मी. प्रती माह प्रमाणे भरून घेण्यात येईल. नेहमीच्या अटी शर्तीवर करारनामा करून भाडेतत्वावर देण्यात येईल. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे न्यु समर्थनगर येथील महानगरपालिकेची व्यायामशाळा पाच वर्षासाठी भाडेतत्वावर देण्यासाठी न्यु समर्थ सांस्कृतिक क्रिडा मंडळ, औरंगाबाद यांच्या वतीने ॲड.श्री.गोरख मोरे यांनी रू.9975/- प्रती माह बोली बोलली असल्याने संबंधीताकडून रू.9975/- प्रती माह प्रमाणे बारा महिन्याचे आगाऊ भाडे रू.1,19,700/- व अनामत रक्कम रू.1,19,700/-, सेवा शुल्क रू.5/- प्रती चौ.मी. प्रती माह प्रमाणे आकारणी करून भाडेतत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.32 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, एम.आय.डी.सी. चिकलठाणा भागात सद्यःस्थितीत जवळपास एकुण 1000 पथदिवे आहेत. सदर पथदिव्यांची देखभाल व दुरूस्ती महानगरपालिका फंडातून करण्यात येते. या कामी अर्थसंकल्पात निधीची तरतूद करावी लागते तसेच सदर पथदिव्यांच्या विद्युत बिलापोटी महानगरपालिका महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस देयके अदा करते.

चिकलठाणा एम.आय.डी.सी. भागातील पथदिव्यांची समस्या दुर करण्यासाठी Replacing of existing 70/150/250W HPSV street light fittings by energy efficient street light fittings on BOT Basis in MIDC Chikalthana area Aurangabad या कामाकरीता सविस्तर प्रस्ताव तयार करण्यात आला. यामध्ये स्पर्धात्मक निविदा मागवून चिकलठाणा एम.आय.डी.सी. भागात Energy Efficient दिवे स्वखर्चाने लावणे व दहा वर्षापर्यंत या दिव्यांची देखभाल स्वखर्चाने करणे, त्या पोटी प्रतिमाह प्रती दिवा (Pole) सुरूवातीस स्वखर्चाने लावलेल्या दिव्यांचा खर्च तसेच दिव्यांच्या देखभाल दुरूस्तीसाठी जी एजन्सी महानगरपालिकेकडून कमीत-कमी रक्कम आकारेल त्या एजन्सीला काम देणे बाबतचा अंतर्भाव होता.

याबाबत मा.आयुक्त महोदय यांच्या शिफारशी नुसार दिनांक 20.2.2007 रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात येऊन विषय क्र.710 अन्वये मान्यता झालेली आहे.

त्यानुसार कार्यालयीन निविदा सुचना No.AMC/Eon/Tender/115/2007, Date 14.03.2007 अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दिवशी चार निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या तारखेपर्यंत दर भरलेल्या चार निविदा प्राप्त झाल्या. त्या दिनांक 7.4.2007 रोजी उपस्थित गुत्तेदारांसमक्ष उघडण्यात आल्या, त्याचा तुलनात्मक तपशील तक्ता खालील प्रमाणे.

1. मे. सोनु इलेक्ट्रीकल्स, नागपुर — रूपये 1,81,80,000/-
2. मे. विनवॉक सिस्टीम, नाशिक — रूपये 3,12,00,000/-
3. मे. एशियन इलेक्ट्रीकल्स — आकड्यात दर दिले नाही.
4. मे.ब्राईट इलेक्ट्रीक वर्क्स, अमरावती — रूपये 2,05,50,000/-

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर मे. सोनु इलेक्ट्रीकल्स, नागपुर यांचे रूपये 1,81,80,000/- आहे. त्यांनी दहा वर्षाच्या कार्यकाळासाठी दिलेल्या प्रति माह/वर्ष निहाय रक्कमेचा तक्ता खालील प्रमाणे.

| **अ.क्र.** | **वर्ष** (कार्यादेशाच्या दिनांकापासून) | **एजन्सीचा दर** | |
|---|---|---|---|
| | | प्रति **माह** करिता | प्रति **वर्षा** करिता |
| 1. | 2. | 3. | 4. |
| 1. | पहिले वर्ष | 2,35,000/- | 28,20,000/- |
| 2. | दुसरे वर्ष | 2,30,000/- | 27,60,000/- |
| 3. | तिसरे वर्ष | 2,20,000/- | 26,40,000/- |
| 4. | चौथे वर्ष | 1,20,000/- | 14,40,000/- |
| 5. | पाचवे वर्ष | 1,10,000/- | 13,20,000/- |

| 1. | 2. | 3. | 4. |
|---|---|---|---|
| 6. | सहावे वर्ष | 1,10,000/- | 13,20,000/- |
| 7. | सातवे वर्ष | 1,10,000/- | 13,20,000/- |
| 8. | आठवे वर्ष | 1,10,000/- | 13,20,000/- |
| 9. | नववे वर्ष | 1,10,000/- | 13,20,000/- |
| 10. | दहावे वर्ष | 1,60,000/- | 19,20,000/- |
| | **एकूण :-** | **1,81,80,000/-** | **1,81,80,000/-** |

उक्त प्रमाणे सर्वात कमी दराची निविदा मे. सोनु इलेक्ट्रीकल्स, नागपुर यांचे रक्कम रूपये 1,81,80,000/- च्या दरास मंजुरी मिळणे बाबत मा.आयुक्तांनीप्रस्ताव स्थायी समितीकडे सादर करणेबाबत शिफारस केलेली आहे.

तरी मे.सोनु इलेक्ट्रीकल्स, नागपुर यांची दहा वर्षाच्या कालावधीसाठी रक्कम रू.1,81,80,000/- ची निविदा स्विकृत करणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.अ.रशीद खान(मामू) : 10 वर्षे कामाची कोण जबाबदारी घेणार आहे. दुरुस्ती करुन दोन-तीन वर्षासाठी प्रस्ताव तयार करावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : प्रस्तावास माझा आक्षेप आहे. स्थगित करावा.

श्री.वसंत नरवडे पाटील: देखभाल दुरुस्ती साहित्यासह करायची आहे. सदस्यांचा कालावधी 5 वर्षाचा आहे, मा.सभापतींचा कालावधी 1 वर्षाचा व स्थायी समिती सदस्यांचा कालावधी 2 वर्षासाठी. मागचे रिपोर्ट काय आहे? सोनु इलेक्ट्रीकल्स यांचे काम असमाधानकारक आहे. निविदा तीन-तीन वर्षासाठी मागवाव्यात.

श्रीमती जयश्री किवळेकर : ही एजन्सी माझ्या प्रभागात काम करते, निकृष्ट दर्जाचे काम आहे. तक्रार केल्यानंतर सहा-सहा महिने काम होत नाही. कधी शिडी नसते तर कधी केबल नसते. एजन्सी नागपूरला आहे, फोन केल्यानंतर तत्परतेने येतात, तपासणी करतात. परंतु करत काही नाही. हा प्रस्ताव रद्द करावा.

श्री.मो.जोवद मो.इसाक : मागच्या वर्षी 10-10 लाखाचे निविदा काढण्यात आले होते. दररोज फोन करावे लागतात. सात महिने झाले आजपर्यंत देखभाल दुरुस्तीची कामे नाहीत. शहराची परिस्थिती वाईट होण्याची शक्यता आहे. निविदा रद्द करावी. देखभाल दुरुस्तीच्या 10 लाखाचे निविदा रद्द कराव्यात.

मा. सभापती : सदर प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो.

**<u>ठराव :</u>**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**<u>ऐनवेळचे विषय</u>**

**<u>विषय क्र.33 :</u>**

उप आयुक्त (प्रशासन) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वर्ष 2007-2008 वर्षा करिता शहाबाजार कत्तलखाना येथील कत्तल फी वसुलीमध्ये 3 व्यक्तींनी भाग घेतला होता, त्यात सर्वात जास्त बोली रू.2,53,000/- इतकी श्री.मोहम्मद अ.नासेर, रा.मदनी कॉलनी, औरंगाबाद यांनी बोलली आहे. करिता वर्ष 2007-2008 वर्षामधील दोन महिन्याची महापालिका कार्यालयाने वसुल केलेली रक्कम वजा करून दिनांक 1/6/2007 पासून कत्तल फी वसुलीचा ठेका श्री.मोहम्मद अ. नासेर यांना देण्यास प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वर्ष 2007-2008 वर्षा करिता शहाबाजार कत्तलखाना येथील कत्तल फी वसुलीकरीता श्री.मोहम्मद अ. नासेर, रा.मदनी कॉलनी, औरंगाबाद यांनी रू.2,53,000/- अशी सर्वात जास्त बोली बोलली असल्याने, दोन महिन्याची कार्यालयाने वसुल केलेली रक्कम वजा करून दिनांक 1/6/2007 पासून कत्तल फी वसुलीचा ठेका श्री.मोहम्मद अ. नासेर यांना देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

‘‘राष्ट्रगीता’’ नंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद